१९३७-२०२६ वर्ष ९० **कृषीवल**

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | बुधवार | दि. २१ ऑक्टोबर २०२६ | अंक १३५ | पृष्ठे ८ | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

मनोज जरांगेंकडून शिंदेंचा समाचार

मुंबई : ''माझ्याकडे पुरावे आहेत, मी पुराव्याशिवाय बोलत नाही,'' असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी दसरा मेळाव्यातून केलेल्या आरोपावर आपण ठाम असल्याचा पुनरुच्चार केला आहे. ''मी कसली टीका टिपणी केली नाही, शिंदे साहेबांनी काय असेल ते सत्य सांगावं. भाजपकडून माझ्या नावाने त्यांनी पैसे घेतले आहेत का? घेतले असतील तर मला दिले आहेत का? त्यांनी हा किंवा नाही काय ते सांगावं, नाहीतर मी पुरावा द्यायला तयार आहे,'' असे म्हणत जरांगे पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना पुन्हा एकदा ५०० कोटी रुपयांच्या देवाण-घेवाणीबद्दल स्पष्टीकरण •➤पान २ वर

वायशेत येथील मारहाणीत एकजण जखमी

रायगड : अलिबाग तालुक्यातील वायशेत येथील चायनीजच्या दुकानात ऑर्डर देण्यावरून वाद झाल्याची घटना मंगळवारी (दि.२०) रात्रीच्या सुमारास घडली. या प्रकरणी तिघांविरोधात अलिबाग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी व त्यांचा मित्र वायशेत येथील चायनीजच्या दुकानात चायनीज पदार्थ खाण्यासाठी गेले होते. मात्र, यावेळी ऑर्डर देण्यावरून वाद झाला. या ठिकाणी असलेल्या काही मंडळींनी त्यांना धक्काबुक्की व मारहाण केली. त्यात एकजण जखमी झाल्याचे त्यांनी सांगितले.

वेधक

कैफियत मांडत स्वतःला संपवले

मुंबई : नांदेडमधील शंकर क्षीरसागर या शेतकऱ्याने कैफियत मांडत स्वतःचे जीवन संपवले. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी शंकर क्षीरसागर यांनी मृत्यूपूर्वी रेकॉर्ड केलेला एक व्हिडीओ शेअर केला आहे. त्यात ते म्हणाले, ''कलेक्टर साहेब, शासनाने तीन वेळा कर्जमाफी केली. पण माझी एकदाही कर्जमाफी झाली नाही. माझे त्यात कधीही नाव आले नाही. आता मी जीवन संपवत आहे. शासनाने माझी चौकशी करावी. तसेच, मुलींचे शैक्षणिक शुल्क माफ केल्याचे शासन सांगते. मात्र, माझ्या मुलीच्या वैद्यकीय शिक्षणाचे शुल्क माफ केलेले नाही. आम्ही अर्ज केले तरी आमच्याकडे लक्ष दिले नाही.'' या व्हिडीओमध्ये रोहित पवारांनी शेतकऱ्यांना वेळीच मदतीचा हात द्यावा, असे आवाहन करताना सरकारला इशाराही दिला.

पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल

नवीन पनवेल : लिव इनमध्ये राहत असलेल्या महिलेच्या मुली सोबत विनयभंग केल्याप्रकरणी अजित नारप्पा रेड्डी याच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात १९ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अजित रेड्डी हा ४३ वर्षीय व्यक्ती एका महिलेसोबत लिवईन रिलेशन मध्ये राहत होता. यावेळी त्याने त्या महिलेकडून ४९ लाख ७३ हजार रुपये घेतले आणि तिच्या मुलीसमोर शरीरसंबंध करून त्यांना मारहाण केली. तसेच, त्यांच्या मुलीला एका दिवसासाठी बाहेर घेऊन गेला आणि महिला घरी नसताना अजितने त्यांच्या मुलीला मोबाईलवर अश्लील व्हिडिओ दाखवले आणि तिचा विनयभंग केला. तसेच, त्याने पीडित महिला आणि त्यांच्या मुलीला शिवीगाळ व मारहाण केली.

पादचाऱ्याचा अपघातात मृत्यू

नवीन पनवेल : वेगाने आलेल्या वाहनाने पादचाऱ्याला दिलेल्या धडकेत त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात वाहन चालकाविरोधात दि.१९ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार, सकाळी साडेसहाच्या सुमारास मुंबई-पुणे महामार्गावर पुण्याकडे जाणाऱ्या मार्गावर ३५ ते ४० वर्षीय अनोळखी व्यक्ती रस्त्यावरून चालत होता. त्यावेळी भरधाव वेगाने आलेल्या वाहनाने त्याला जोरात धडक दिली आणि त्यात तो गंभीर जखमी होऊन त्यातच त्याचा मृत्यू झाला.

चौकशीदरम्यान मोठा खुलासा

मुंबई : अभिनेता टायगर श्रॉफ याच्यावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपींनी चौकशीदरम्यान खळबळजनक खुलासा केला आहे. पोलिसांनी या प्रकरणात तीन आरोपींना राजस्थानमधील कोटा येथून अटक केली होती. त्यांची सध्या कसून चौकशी सुरू आहे. प्राथमिक चौकशीत टायगर श्रॉफ हा आरोपींचा मूळ निशाणा नव्हता, तर त्यांना बॉलिवूडमधील अन्य एका मोठ्या सेलिब्रिटीला लक्ष्य करायचे होते, अशी माहिती समोर आली आहे. पोलिसांच्या चौकशीत आरोपींनी सुरुवातीला दुसऱ्याच एका मोठ्या सेलिब्रिटीला लक्ष्य करण्याची योजना आखल्याचे सांगितले. मात्र, ठरवलेल्या व्यक्तीपर्यंत पोहोचता न आल्याने त्यांनी टायगर श्रॉफला लक्ष्य केल्याची माहिती आहे.

रायगडात पाणीसंकट

- गतवर्षीच्या तुलनेत यंदा कमी जलसाठा
- प्रशासनासमोर पाणीनियोजनाचे आव्हान



प्रमोद जाधव
। रायगड ।

दिर्घ प्रतिक्षेनंतर जिल्ह्यामध्ये पाऊस कोसळला तरी धरणे, तलाव, नदी, विहीरी पाण्याने तुडुंब भरल्या. त्यामुळे लघुपाट बंधारे विभागाच्या धरणांमध्ये ९१.२८ टक्के जलसाठाअसल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, सप्टेंबरपासून जिल्ह्यातून पाऊस गायब झाल्यामुळे धरणांमधील जलसाठा हळूहळू कमी झाल्याचे आकडेवारीनुसार दिसून आले आहे. गतवर्षी याच कालावधीत १६ धरणे पाण्याने शंभर टक्के भरली होती. यंदा मात्र आतापर्यंत १५ धरणांमध्ये ९५ ते ९९ टक्के जलसाठा आहे. त्यात ३ धरणांमध्ये ९९ टक्के, तर ६ धरणांमध्ये ९६ टक्के जलसाठा आहे. गतवर्षीच्या तुलनेने यंदा धरणांमध्ये जलसाठा कमी आहे. त्यामुळे आगामी काळात पाणी टंचाईची समस्या भेडसावण्याची भिती निर्माण झाली आहे.

गेल्या वर्षी मे महिन्यापासूनच पाऊस सुरू झाला होता. जिल्ह्यात पाऊस मोठ्या प्रमाणात पडल्याने धरणेही पाण्याने फुल्ल झाली होती. त्यामुळे ऑक्टोबर महिन्याच्या दूसऱ्या आठवड्यापर्यंत जिल्ह्यातील २८ धरणांपैकी १६ धरणांमध्ये शंभर टक्के, ३ धरणांमध्ये ५० ते ६४ टक्के, उर्वरित ३ •➤पान २ वर

जलजीवन योजना फेल ?

प्रति माणसी ५५ लिटर पाणी देण्याच्या उद्देशाने केंद्र सरकार पुरस्कृत जलजीवन योजना राबविण्यात आली. रायगड जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागामार्फत या योजनांची अंमलबजावणी करण्यात आली. त्यासाठी करोडो रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. पाण्याचे स्त्रोत निर्माण करून नळाद्वारे घरापर्यंत पाणी देण्याचा प्रयत्न करण्यात आला. जिल्ह्यातील पंधरा तालुक्यांमध्ये हाती घेतलेल्या १ हजार ४९६ योजनांपैकी ६१३ योजनांची कामे पुर्ण झाली आहेत. उर्वरित कामे अजूनही प्रगती पथावर असून, काही कामे निधीअभावी ठप्प झाली आहेत. त्यामुळे या योजनेच्या कामांबाबत अनेकांनी नाराजी व्यक्त केली. योजना राबवून जिल्ह्यातील अनेक गावे, वाड्यांमधील घरांत पाणी पोहचलेच नाही. नळ कनेक्शन देण्यात आले; परंतु, त्या नळांमध्ये पाणी नाही. त्यामुळे ही योजना जिल्ह्यात फेल ठरल्याचे बोलले जात आहे.

> **जिल्ह्यातील धरणांमध्ये सध्या पाणी मुबलक आहे. परंतु, पावसाअभावी पाण्याची समस्या भेडसावणार आहे. पाण्याची समस्या सोडविण्यासाठी वनराई बंधारे बांधण्याची सुरुवात करण्यात आली आहे. पिण्याच्या पाण्यासह जनावरांना पाणी देण्यावर अधिक भर दिला आहे. प्रत्येकाने पाणी जपून वापरावे, असे आवाहनही करण्यात येत आहे. थकीत बिलांमुळे ग्रामपंचायतीमधील एमआयडीसीद्वारे होणारा पाणी पुरवठा खंडीत होणार नाही, याची काळजी घेतली जाईल. याबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडून कार्यवाही केली जाईल.**
>
> **-भरत गोगावले, पालकमंत्री, रायगड**

सरकारी जमीन ट्रस्टच्या घशात घालण्याचा घाट?

- स्थानिकांच्या हक्कांचा प्रश्न ऐरणीवर
- कविता पाटील यांच्याकडून नाराजी व्यक्त

। उरण । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यातील पुनाडे येथील तब्बल ९२.७० एकर सरकारी जमीन बोचासनवासी श्री अक्षर पुरुषोत्तम स्वामीनारायण ट्रस्टला विद्यापीठ उभारण्यासाठी देण्याच्या प्रक्रियेवरून स्थानिकांच्या हक्कांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गावाच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी उपयोगी पडू शकणाऱ्या या जमिनीचा विचार करण्याऐवजी खासगी संस्थेला जमीन देण्याची प्रक्रिया पुढे सरकत असल्याने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या पंचायत समिती सदस्या कविता रूपेश पाटील यांनी नाराजी व्यक्त केली आहे. पंचायत समितीच्या मासिक बैठकीत त्यांनी या निर्णयाला विरोध दर्शविणारा ठराव घेण्याची सूचनाही केली.

पुनाडे गावाच्या हद्दीत सरकारी खराबा, आकारी पड, महाराष्ट्र शासन आणि गुरचरण अशा नोंदी असलेली सुमारे ११९.५९२ हेक्टर म्हणजेच २९५.५२ एकर जमीन आहे. यापैकी ३७.५१५ हेक्टर अर्थात ९२.७० एकर जमीन विद्यापीठ उभारण्यासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी स्वामीनारायण संस्थेने केल्याचे सांगण्यात येते. या जमिनीच्या मोजणीसंदर्भात महाराष्ट्र शासनाचे कक्ष अधिकारी संदीपान देवणे यांनी ६ ऑक्टोबर २०२५ रोजी रायगड जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठविले होते. संबंधित जमीन सलग आहे किंवा कसे, याची पडताळणी करून तपशील शासनाला सादर करण्यासह शासकीय मोजणी करण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. •➤पान २ वर

दसरा मेळाव्यातून ठाकरेंचा हल्लाबोल

बिश्नोईला खेचून आणण्याचे आव्हान

। मुंबई । प्रतिनिधी ।

विजयादशमीच्या निमित्ताने मंगळवारी (दि.२०) शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत दादर येथील शिवाजी पार्कवर दसरा मेळावा पार पडला. या मेळाव्याला अनेक दिग्गज नेत्यांनी उपस्थिती दर्शवली होती. या मेळाव्यात बोलताना उद्धव ठाकरे यांनी देशातील विविध विषयांवर महत्त्वाचे भाष्य केले. यावेळी त्यांनी आपल्या भाषणात एकनाथ शिंदे, भाजपा, पंतप्रधान मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि देवेंद्र फडणवीस यांच्यावरही जोरदार टीका केली. तसेच, महाराष्ट्रातील दुष्काळाच्या



परिस्थितीवरही महत्त्वाचे भाष्य केले.

यावेळी उद्धव ठाकरे यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांपासून ते राज्यातील कायदा-सुव्यवस्थेपर्यंत अनेक मुद्द्यांवरून सत्ताधाऱ्यांना धारेवर धरले. शेतकऱ्यांना दिलेली ५ हजार रुपयांची मदत म्हणजे दिलासा नसून, त्यांची थट्टा असल्याची टीका त्यांनी केली. पीक पंचनामे, रखडलेली कर्जमाफी, नमो किसान योजनेची अपूर्ण अंमलबजावणी आणि केंद्राच्या पथकाच्या कामावरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. दसऱ्याच्या दिवशी सोनं लुटण्याची परंपरा ही 'सोन्यासारखं राहा' असा संदेश देणारी आहे. मात्र, दुसरीकडे पंतप्रधान सोनं खरेदी करू नका, असे सांगतात, याकडे लक्ष वेधत त्यांनी सरकारच्या भूमिकेवर टीका केली. निवडणुकीत मतांची चोरी होत असल्याचा आरोप करत, आता आणखी काय लुटायचे बाकी ठेवले आहे, असा सवालही त्यांनी केला. कितीही दरोडेखोर आले तरी आमचा भगवा कोणीही चोरू शकत नाही, •➤पान २ वर

टोरंट प्रकल्पासाठी लाखो झाडांची कत्तल

- धरणाच्या बुडीत क्षेत्रासाठी प्रशासनाची धडपड
- पर्यावरण बचाव समिती आक्रमक

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील पाली तर्फे कोतवाल खलाटी या ग्रामपंचायतीमध्ये टोरंट पॉवर कंपनी वीज प्रकल्प उभारत आहे. या प्रकल्पाच्या दृष्टीने वेगळ्या हालचाली सुरू झाल्याने कर्जत पर्यावरण बचाव समिती आक्रमक झाली आहे. तसेच, त्या ठिकाणच्या बुडीत क्षेत्रात असलेल्या जमिनीवरील झाडे तोडण्यास सुरुवात झाली असल्याने झाडे तोडण्यासाठी जमिनी कोणी दिल्या, असे प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.



३२,४९० झाडे तोडणार

वन विभागाने येथील ३२,४९० झाडे निष्कासित करून अन्य ठिकाणी त्यांची लागवड करण्याचे जाहीर केले आहे. मात्र, त्या सायडोंगर परिसरात तब्बल ३ लाख झाडे आहेत, असा दावा कर्जत पर्यावरण बचाव समिती करीत आहे.

गुजरात राज्यातील टोरंट पॉवर या कंपनीला रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील पाली तर्फे कोतवाल खलाटी येथे सायडोंगर भागात हायड्रॉलिक प्रकल्प उभारत आहे. या प्रस्तावित धरण प्रकल्पाला धरण परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांनी विरोध केला आहे. तेथे ६४० हेक्टर जमीन वन विभागाची असून, २३० हेक्टर जमीन खासगी जमिनीवर हा प्रकल्प उभारला जाणार आहे.वन जमिनीवर असलेली लाखो झाडे आहेत आणि ही झाडे स्थानिकांनी श्रमदान करून लावली आणि वाढवली आहेत. आता तीच सर्व झाडे तोडण्यास सुरुवात झाली असून, या धरणाच्या बुडीत क्षेत्रात असलेली झाडे नष्ट होऊ लागली आहे. बुडीत क्षेत्रातील काही जमीन क्षेत्र हे खासगी असून, त्या जमिनीवरील झाडे तोडण्यास सुरुवात झाली आहे. या १५ हजार कोटी रुपये खर्चाच्या प्रकल्पाच्या कामाचा भूमिपूजन •➤पान २ वर

बंटी-बबलीचा उरणमध्ये धुमाकूळ



। चिरनेर । प्रतिनिधी ।

उरण शहर आणि परिसरात गेल्या काही महिन्यांपासून घरफोड्यांच्या घटनांनी हैराण झालेल्या नागरिकांना अखेर दिलासा मिळाला आहे. घरातून टीव्ही चोरीला गेल्याच्या एका साध्या तक्रारीवरून उरण पोलिसांनी केलेल्या सखोल तपासात सराईत बंटी-बबलीसह चौघांच्या टोळीला जेरबंद करण्यात यश आले आहे. या टोळीकडून तब्बल २८ घरफोडीच्या गुन्ह्यांची उकल झाली आहे.

उरण शहरात एका घरातून टीव्ही चोरी झाल्याची तक्रार दाखल झाली होती. या तक्रारीची गंभीर दखल घेत उरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जगदीश शेलकर यांच्या मार्गदर्शनाखाली उरण पोलिसांचे एक विशेष पथक तयार करण्यात आले. या पथकाने घटनास्थळाची पाहणी, सीसीटीव्ही •➤पान २ वर

दुर्गा मातेला भावपुर्ण निरोप

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

नवरात्रौत्सवानिमित्त नऊ दिवस देवीची पुजा करण्यात आली. मनोभावेसेवेनंतर दुर्गा मातेला दसऱ्याच्या दिवशी गुरुवारी (दि.२०) निरोप देण्यात आला. दरम्यान, ग्रामीण व शहरी भागात सायंकाळी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी जिल्ह्यातील १ हजार ३३४ दुर्गा मुर्तींचे विसर्जन तलाव, नदी व समुद्रात करण्यात आले. विसर्जनावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांचा कडेकोट पहारा ठेवण्यात आला होता. त्यामुळे हा सोहळा मोठ्या उत्साहात आणि मंगलमय वातावरणात पार पडला.



१ हजार ३३४ मूर्तींसह १९२ प्रतिमांचे विसर्जन

रायगड जिल्ह्यामध्ये मोठ्या उत्साहात रविवारी (दि.११) देवींचे स्वागत करण्यात आले होते. सकाळी विधीवत पुजा करून ५ हजार ५३ ठिकाणी घट स्थापन करण्यात आले. त्यामध्ये १ हजार ३३४ मूर्तींची प्रतिष्ठापना आणि १९२ देवींच्या प्रतिमांची स्थापना करण्यात आली. गेल्या नऊ दिवसांपासून जिल्ह्यात नवरात्रौत्सव साजरा करण्यात आला. यावेळी ग्रामीण व शहरी भागातील नाक्यानाक्यावर •➤पान २ वर

तहसील कार्यालयात शेतकऱ्यांची ससेहोलपट

हेलपाटे मारून छळवणूक केल्याचा आरोप

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

अलिबागमध्ये शेतकऱ्यांचे परंपरागत रस्ते अडवणूकीचा प्रकार धनदांडग्यांकडून सर्रास होत आहे. न्याय मिळावा, म्हणून गेल्या चार वर्षांपासून शेतकरी सरकारी कार्यालयात चपला झिजवत आहेत. मात्र, शेतकऱ्यांच्या तक्रारीकडे तहसीलदारांना लक्ष देण्यास फुरसत मिळत नसल्याचा आरोप होत आहे. सुनावणी आणि तारखांच्या नावाखाली वेळकाढूपणा केला जात आहे. त्यामुळे तहसील कार्यालयाकडून नाहक हेलपाटे मारून शेतकऱ्यांची छळवणूक होत असल्याचा आरोप शेतकरी नारायण जाधव यांनी केला असून, तहसील कार्यालयात शेतकऱ्यांची ससेहोलपट होत असल्याचे बोलले जात आहे.

नारायण जाधव यांच्याकडून मिळालेल्या निवेदनानूसार, अलिबाग-पेण मार्गावरील रस्त्यालगतच पळी-आंबेघर येथे त्यांची स.नं. २८/१ मध्ये ४५ गुंठे शेत जमीन आहे. पिढ्यापिढ्या भात पिकांसह इतर पिकांची लागवड करण्याचे काम ते करीत आहेत. तसेच, विक्रमी उत्पादन घेतल्यमुळे त्यांचा सन्मानही झाला आहे. त्यांच्या शेत जमीनीच्या जवळ काही धनदांडग्यांनी प्लॉट पाडून जमीनी खरेदी केल्या आहेत. •➤पान २ वर

दागिन्यांसह वाहन खरेदीची लुट | **चारशेहून अधिक दुचाकी, शंभरहून अधिक चारचाकी खरेदी**

दसऱ्यानिमित्त जिल्ह्यातील बाजारात तेजी

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

दसऱ्यानिमित्त वस्तू खरेदी करणे शुभ मानले जाते. त्यामुळे रायगड जिल्ह्यात दसऱ्यानिमित्त मंगळवारी (दि.२०) वेगवेगळ्या वस्तू खरेदीचा उत्साह दिसून आला. यावेळी वाहन, फर्निचर, इलेक्ट्रॉनिक वस्तू यासह सराफ बाजारात जोरदार खरेदीसाठी गर्दी दिसून आली. एका दिवसात चारशेहून अधिक दुचाकी आणि शंभरहून अधिक चारचाकी वाहने खरेदी झाली आहेत. गतवर्षीच्या तुलनेने यंदा दुचाकी खरेदीत काही ठिकाणी २० टक्क्यांची वाढ तर काही ठिकाणी २० टक्क्यांनी घट झाल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.





(छायाचित्र : समीर मालोदे)

सोन्याच्या किंमती वाढल्या असल्या तरीदेखील सोने खरेदीचा उत्साह कायमच असल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात आले. त्यामुळे बाजारात तेजीचे वातावरण दिसून आले.

नवरात्रौत्सवानंतर दसऱ्याच्या मुहूर्तावर सोने, जागा, घर, वाहन खरेदी करणे शुभ मानले जाते. त्यामुळे दसऱ्याच्या निमित्ताने घरगुतीपासून वेगवेगळ्या प्रकारच्या लहान मोठ्या वस्तू प्रत्येकजण आपआपल्या परीने खरेदी करतात. ही परंपरा यावर्षीही मंगळवारी दिसून आली. ग्राहकांकडून खरेदीवर अधिक भर देण्यातआला. दसऱ्याच्या मुहूर्तावर वेगवेगळ्या लहान मोठ्या वस्तू आपल्या ऐपतीप्रमाणे खरेदी करण्यात आल्या. दुचाकी, चारचाकी तसेच विजेवर चालणाऱ्या उपकरणांसह सोने खरेदीचा उत्साह अधिक दिसून आला. दसऱ्या निमित्त जिल्ह्यातील बाजारपेठांमध्ये सोन्याचे दर वाढले असले तरी काहींनी दसऱ्याच्या मुहूर्तावर लहान मोठे दागीने खरेदी केल्याची माहिती व्यावसायिकांनी दिली. या •➤पान २ वर

> गतवर्षीच्या तुलनेने यंदा दुचाकी खरेदीवर अधिक भर देण्यात आला. पेट्रोलवर चालणाऱ्या दुचाकीला अधिक मागणी होती. काहींनी रोखीत तर काहींनी कर्जावर वाहन खरेदी केली. वाहन खरेदीसाठी वेगवेगळ्या सवलती ठेवण्यात आल्या होत्या. त्यामुळे ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. दसऱ्याच्या दिवशी एका दिवसामध्ये साधारणतः होन्डा कंपनीच्या दोनशेहून अधिक दुचाकी खरेदी करण्यात आल्या आहेत.
>
> - नवीन झा, होंडा शोरुम

पाहिजेत

व्यावसायिक वापरासाठी जागा/जमीन भाड्याने घेणे आहे.

- पळस्पे फाटा ते शेडुंग टोल प्लाझा दरम्यान राष्ट्रीय महामार्गालगत डावीकडे, उजवीकडे
- पळस्पे फाटा ते पेण दरम्यान, मुंबई-गोवा महामार्गालगत डावीकडे, उजवीकडे
- भेंडखळ, खोपटा कचेरपाडा, सोनारी, द्रोणागिरी, जेएनपीटी परिसर, चिर्ले, धुतूम, जासई, गव्हाणफाटा डावीकडे, उजवीकडे
- नवी मुंबईमधील कळंबोली, पनवेल शहर, उलवे, खारघर, कळंबोली ते डोंबिवली शिळफाटा रोड. तसेच उरण तालुका, पनवेल तालुका, रायगड जिल्हा या भागातच मुख्य रस्त्याजवळ १८ ते ६० गुंठे जागा/जमीन व्यवसायायिक वापरासाठी दीर्घकालीन मुदत तत्वावर भाड्याने हवी आहे.

जमीन मालक, रिअल इस्टेट एजंट यांनी संपर्क करावा.

मोबाईल व्हॉटसॲप नंबर : ९८३३१३८१११

महाडमधील कुडुक खुर्दमध्ये जलक्रांती

| महाड | प्रतिनिधी |

महाराष्ट्रात अनेक गावांमध्ये पाणीटंचाईने डोके वर काढले असताना दुर्गम आणि डोंगराळ भागात वसलेल्या कुडुक खुर्द गावाने शासनाच्या मदतीची वाट न पाहता लोकसहभाग आणि श्रमदानाच्या जोरावर जलक्रांती घडवून आणत संपूर्ण जिल्ह्यासमोर आदर्श निर्माण केला आहे. महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान व सशक्त पंचायत निर्माण अंतर्गत ग्रामपंचायत कुडुक खुर्द आणि महिला बचत गटांच्या पुढाकाराने 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा उपक्रम मोठ्या उत्साहात राबविण्यात आला. यंदा पावसाने दडी मारली असली तरी भविष्यातील पाणीटंचाईवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी गावाने एकजूट दाखवत हा मार्ग स्वीकारला आहे.

कुडुक खुर्द हे गाव डोंगराळ व वनक्षेत्रात वसलेले असल्याने पावसाचे पाणी वेगाने वाहून जाते



आणि परिणामी उन्हाळ्यात विहिरी, बोअरवेल आणि नैसर्गिक झरे कोरडे पडतात. दरवर्षी गावाला तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. त्यामुळे पिण्याचे पाणी, जनावरे, झाडे, भाजीपाला आणि कपडे धुण्यासारख्या दैनंदिन कामांसाठी मोठी अडचण निर्माण होते. या गावात दरवर्षी जलसंधारणाचे असे उपक्रम राबविले जातात आणि त्याचा जनावरांना, झाडांना व शेतीला मोठा फायदा होतो, असे स्थानिक नागरिक संदेश

- **पाणीटंचाईवर मात करण्यासाठी एकजूटी**
- **श्रमदानातून बांधले सात बंधारे**

पवार यांनी सांगितले. हीच गंभीर समस्या ओळखून ग्रामस्थांनी एक दिवसीय श्रमदानातून नदी आणि ओढ्याच्या प्रवाहावर सात ठिकाणी वनराई बंधारे व कच्चे मातीचे बंधारे बांधण्याचे काम युद्धपातळीवर पूर्ण केले. नैसर्गिक दगड, माती व स्थानिक साहित्याचा वापर करून हे बंधारे शास्त्रोक्त पद्धतीने उभारण्यात आले असून यामुळे पावसाचे पाणी अडवून ते जमिनीत मुरण्यास मोठी मदत होणार आहे.

या अभियानात गावातील महिला बचत गट, युवक, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेत सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत अखंड श्रमदान केले. या उपक्रमात ग्रामसेवक दिनेश जाधव, डेटा ऑपरेटर रोहित भेकत, रोजगार सहाय्यक गजानन पवार, शिपाई ऋतिक कदम, ग्रामसंघ सावित्रीबाई फुले सीआरपी स्वप्नाली संदेश पवार, पोलीस पाटील प्रणिता नाकते, दिलीप कदम यांच्यासह सर्व बचत गटातील महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. महिला बचत गटाच्या पुढाकारामुळे या मोहिमेला खरी गती मिळाल्याचे ग्रामसेवकांनी सांगितले.

या शास्त्रोक्त जलसंधारणामुळे भूजल पातळीत मोठी वाढ होऊन शेती उत्पादनात २० ते २५ टक्के वाढ होण्याचा अंदाज तालुका कृषी विभागाने व्यक्त केला आहे. तसेच गेल्या काही वर्षांपासून बंद पडलेले नैसर्गिक झरे पुन्हा जिवंत होण्यास मदत होणार असून जनावरांसाठी बारमाही पाणी उपलब्ध होणार आहे. जिल्हा प्रशासनानेही या कामाची विशेष दखल घेत कुडुक खुर्दचा हा आदर्श उपक्रम इतर गावांसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याचे म्हटले आहे.

आर्थिक समावेशन संतृप्तता अभियानाचा २२ ऑक्टोबर रोजी पेण येथे शुभारंभ

| रायगड | प्रतिनिधी|

वित्तीय सेवा विभाग, अर्थ मंत्रालय, भारत सरकार यांच्या निर्देशानुसार संपूर्ण देशात राबविण्यात येणाऱ्या आर्थिक समावेशन संतृप्तता अभियानाची सुरुवात दि.२१ ऑक्टोबर पासून होणार आहे. या अभियानाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याचा शुभारंभ कार्यक्रम गुरुवारी (दि.२२) पेण येथील मराठा समाज भवन येथे आयोजित करण्यात आला आहे.

या अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी नियोजन बैठक घेऊन सहभागी बँकांना आवश्यक सूचना दिल्या आहेत. अभियानांतर्गत निर्धारित उद्दिष्टे साध्य करण्यासाठी योग्य नियोजन करावे, पात्र लाभार्थ्यांपर्यंत विविध आर्थिक समावेशन योजना पोहोचवाव्यात आणि अभियान प्रभावीपणे राबवावे, अशा सूचना या बैठकीत देण्यात आल्या. या अभियानाच्या माध्यमातून पात्र नागरिकांना विविध आर्थिक समावेशन योजना आणि बँकिंग सेवांचा लाभ मिळवून देण्यावर भर देण्यात येणार आहे. प्रधानमंत्री जनधन योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना आणि अटल पेन्शन योजना यांसारख्या योजनांबाबत जनजागृती करणे आणि पात्र लाभार्थ्यांची नोंदणी करणे ही अभियानाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. अभियानांतर्गत निष्क्रिय बँक खाती पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक कार्यवाही, आधार जोडणी, प्रलंबित पुनः केवायसी, सी-केवायसी नोंदणी आणि खात्यांमध्ये नामनिर्देशन अद्ययावत करणे यावर विशेष भर देण्यात येणार आहे. तसेच, पात्र शेतकऱ्यांना किसान क्रेडिट कार्ड योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत.

याशिवाय, आपली पुंजी, आपला अधिकार हा उपक्रमही अभियानाचा एक महत्त्वाचा भाग आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये आर्थिक जागरूकता निर्माण करणे आणि त्यांना त्यांच्या आर्थिक अधिकारांविषयी माहिती देणे यावर भर देण्यात येणार आहे. नागरिकांना डिजिटल बँकिंगचा सुरक्षित वापर आणि डिजिटल आर्थिक फसवणुकीपासून बचाव याबाबतही मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

पेण येथे होणाऱ्या महाराष्ट्र राज्यस्तरीय शुभारंभ कार्यक्रमात भारतीय रिझर्व्ह बँक, राज्यस्तरीय बँकर्स समिती, सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील बँकांचे वरिष्ठ अधिकारी तसेच जिल्हा प्रशासनातील अधिकारी सहभागी होण्याची अपेक्षा आहे. कार्यक्रम स्थळी सहभागी बँकांचे स्वतंत्र स्टॉल उभारण्यात येणार असून, त्याद्वारे विविध बँकिंग सेवा आणि आर्थिक समावेशन योजनांची माहिती नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख मदत द्या

राष्ट्रवादीचे सज्जाद डावरे यांची सरकारकडे मागणी

| माणगाव | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील केवळ श्रीवर्धन हा एकमेव तालुका सरकारने दुष्काळग्रस्त घोषित केला. मात्र, जिल्ह्यातील संपूर्ण १६ तालुक्यांत दुष्काळग्रस्त परिस्थिती निर्माण झाली असून, जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने हेक्टरी १ लाख रुपये मदत द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष सज्जाद डावरे यांनी सरकारकडे केली आहे. सरकारने गोरगरीब कष्टकरी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना केवळ ५ हजार रुपयांची मदत जाहीर करून गरीब शेतकऱ्यांची क्रूरचेष्टा केली असल्याचा सरकारवर हल्लाबोल पत्रकार परिषदेत बोलताना केला.

माणगाव येथे सज्जाद डावरे यांनी सोमवारी (दि.१९) पत्रकार परिषद घेऊन रायगड जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त परिस्थिती, स्मार्ट मीटरमुळे भरमसाठ येणारे वीजबिल व त्यामुळे हैराण झालेले वीज ग्राहक तसेच बल्क ड्रग पार्क ऐवजी आयटी पार्क येणे गरजेचे या मुद्द्यांवर सडेतोड आपले म्हणणे मांडले.

यावेळी बोलताना सज्जाद डावरे म्हणाले की, जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांतील शेतकरी राजा दुष्काळग्रस्त परिस्थितीमुळे निराश झाला आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला भात हा पूर्णपणे करपून गेला आहे. त्यामुळे गरीब शेतकरी पुरता हवालदिल झाला आहे. शेतकरी राजा हा बँक कर्ज काढून किंवा श्रीमंत लोकांकडून व्याजाने पैसे काढून आपली भातशेती करीत असतात. हि भातशेती नष्ट झाल्यामुळे गुरांचेही हाल झाले आहेत. भात पीकच नसल्यामुळे गुरांना खाण्यासाठी पेंडा देखील मिळणार नाही. जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ आली आहे, अशी भयावह परिस्थिती जिल्ह्यातील शेतकरी राजाची झाली आहे. या गरीब शेतकऱ्यांना केवळ ५ हजार रुपये मदत जाहिर करून सरकारने या शेतकऱ्यांची क्रूरचेष्टा केली आहे. या गरीब दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने हेक्टरी १ लाख रुपये मदत द्यावी अशी मागणी सज्जाद डावरे यांनी केली.

स्मार्ट मीटर व त्यामुळे येणारे भरमसाठ वीजबिल या प्रश्नाबाबत बोलताना डावरे म्हणाले कि, स्मार्ट मीटरमुळे भरपूर वीजबिल येत आहेत. युनिट भरपूर पडत असल्याने दर महिन्याला येणारे बिल वाढून येत आहे. दिवसाला ३०० ते ५०० रुपये कमावून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह भागविणाऱ्या व्यक्ती दर महिन्याला ३,००० ते १०,००० असे बिल आले तर ती व्यक्ती एवढे बिल कोठून भरणार याकडेही सरकारने लक्ष देणे गरजेचे आहे, असे सज्जाद डावरे म्हणाले. जिल्ह्यातील अनेक सुशिक्षित बेरोजगार तरुण - तरुणींना रोजगाराच्या संधी उपलब्ध नाहीत. याकडे सरकारने लक्ष न दिल्यास राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष तीव्र आंदोलन करेल, असा इशारा त्यांनी दिला आहे.



● दसऱ्यानिमित्त चारचाकी वाहन खरेदी करून आनंद साजरा करताना कुटुंबिय.

रूम न देता फसवणूक

नवीन पनवेल : ११ लाख २९ हजार रुपये स्वीकारून रूम न दिल्याप्रकरणी नवीन पनवेल येथील रामनरेश चव्हाण यांच्या विरोधात दि.१९ ऑक्टोबर रोजी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमित पाटील हे सुवर्णभूमी कॉम्प्लेक्स सुकापुर येथे राहत असून, त्यांना विचुंबे येथील शिवशक्ती रेसिडेन्सी इमारतीमधील सदनिका रामनरेश चव्हाण यांच्याकडून विक्री केली. व्यवहारापोटी पनवेल येथील दुय्यम निबंधक कार्यालयात विक्री खताची नोंदणी करून त्यांच्याकडून ११ लाख २९ हजार रुपये घेतले. या सदनिकेचा त्यांना ताबा न देता अन्य व्यक्तीला त्यात ठेवून पाटील यांची फसवणूक केली.

पान १ वरुन

मनोज जरांगेंकडून शिंदेंचा समाचार

मागितले आहे. मनोज जरांगे पाटील यांनी नारायणगडावरील दसरा मेळाव्यातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नाव घेत ५०० कोटी रुपयांची देवाण घेवाण झाल्याचा आरोप केला. एकनाथ शिंदेसाहेब तुम्ही दिल्लीत भाजपच्या लोकांना माझ्याबद्दल खोट सांगितले. कारण, मनोज जरांगे पाटलांना श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून ५०० कोटी पोहोचले आहेत, असे तुम्ही भाजपच्या नेत्यांना बोलले का? असा सवाल मनोज जरांगे यांनी मेळाव्यातून उपस्थित केला. तसेच, एकनाथ शिंदे यांनी आजच्या दसऱ्या मेळाव्यात किंवा उद्या संध्याकाळपर्यंत शिंदेंनी उत्तर द्यावे, असेही त्यांनी म्हटले.

रायगडात पाणीसंकट

धरणांमध्ये ३६ ते ४० टक्के आणि ४ धरणांमध्ये ३ ते २५ टक्के, तर एका धरणांमध्ये ८२ टक्के जलसाठा होता. मात्र, यंदा जिल्ह्यामध्ये जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पावसाने हजेरी लावली. जूलैच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पाऊस चांगला पडला. त्यानंतर ऑगस्ट महिन्यात पावसाची रिपरिप चालू होती. त्यामध्ये जिल्ह्यातील लघू पाटबंधारे विभागाची २८ धरणे पाण्याने भरली. मात्र, सप्टेंबरपासून पावसाने खेळखंडोबा सुरु केला. त्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून उन्हाचे चटके जाणवू लागले. उष्णतेमुळे पाण्याची पातळी कमी होऊ लागली. त्यामुळे जिल्ह्यातील धरणांमध्ये ९१ टक्के जलसाठा असला, तरी गतवर्षीच्या तुलनेने यंदा जिल्ह्यातील धरणांमध्ये जलसाठा कमी असल्याचे टक्केवारीनुसार दिसून येत आहे. यंदा ३ धरणांमध्ये ९९ टक्के, ६ धरणांमध्ये ९६ टक्के, अन्य ३ धरणांमध्ये ९७ टक्के इतका जलसाठा आहे. उर्वरित धरणांमध्ये ९५ टक्क्यांपासून खाली जलसाठा असून, ३ धरणांमध्ये ५० टक्केच पाण्याचा साठा असल्याचे समोर आले आहे.

जिल्ह्यातील काही गावे एमआयडीसीच्या पाण्यावर अवलंबून आहेत. मात्र, एमआयडीसीच्या पाण्यासाठीदेखील दोन ते तीन दिवसांची प्रतिक्षा नागरिकांना करावी लागत आहे. जिल्ह्यामध्ये लघुपाट बंधारे विभागाच्या अखत्यारित २८ धरणे आहेत. या धरणांद्वारे लाखो नागरिकांना पाणी पुरवठा केला जातो. रायगडसह नवी मुंबई व इतर जिल्ह्यातील गावांना पाणी पुरवठा जिल्ह्यातील धरणांमधून केला जात आहे. परंतु, यंदा पाऊस लवकर गायब झाल्याने पाण्याचा प्रश्न आतापासून भेडसावू लागला आहे. अनेक गावांना चार ते आठ दिवस पाण्याची प्रतिक्षा करावी लागत आहे. धरणांमधील पाण्याची पातळी कमी होऊ लागल्याने आगामी काळात पाण्याचा दुष्काळ वाढण्याची भिती निर्माण झाली आहे.

सरकारी जमीन ट्रस्टच्या घशात घालण्याचा घाट?

या जमिनीच्या मोजणीसाठी आलेल्या पथकाला पुनाडे ग्रामस्थांनी विरोध दर्शविला होता. मात्र, ग्रामस्थांचा विरोध असतानाही पोलीस बंदोबस्तात मोजणी करण्यात आली. त्यामुळे या जमिनीच्या भवितव्याबाबत ग्रामस्थांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. एका संस्थेच्या विद्यापीठासाठी सरकारी यंत्रणा वेगाने हालचाली करीत असेल, तर त्याच जमिनीचा उपयोग गावाच्या विकासासाठी कसा करता येईल, याचाही गांभीर्याने विचार व्हायला नको का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. स्वामीनारायण संस्थेला विद्यापीठ उभारण्यासाठी ही जमीन देण्याचा निर्णय दुर्दैवी आहे. पुनाडे गावाच्या वाढीव गावठाणासाठी, खेळाचे मैदान व उद्यान उभारण्यासाठी, आदिवासी बांधवांना नियमानुसार वनपट्टे देण्यासाठी तसेच भविष्यातील कचरा व्यवस्थापनासाठी या जमिनीचा उपयोग करता येऊ शकतो. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन या जमिनीबाबत शासनाने फेरविचार करावा, यासाठी पाठपुरावा करणार आहोत. सरकारी बाबूंच्या धोरणांना वेळीच जाब विचारला नाही, तर गावांच्या हद्दीतील सरकारी जमिनींच्या वापरातून स्थानिकांचे हित मागे पडण्याची भीती आहे. पुनाडेच्या जमिनीबाबत ग्रामस्थांच्या हक्कांचा आणि गावाच्या भविष्याचा विचार झालाच पाहिजे, असे कविता रूपेश पाटील यांनी सांगितले.

बंटी-बबलीचा उरणमध्ये धुमाकूळ

फुटेज आणि गुप्त बातमीदारांच्या माहितीच्या आधारे शोधमोहीम राबवत चार संशयितांना ताब्यात घेतले होते. पोलीसी खाक्या दाखवताच संशयितांनी आपल्या गुन्ह्याची कबुली दिली आणि तपासात धक्कादायक माहिती समोर आली. ताब्यात घेतलेल्या चार संशयितांपैकी मुख्य सूत्रधार असलेल्या दोघांनी आतापर्यंत उरणसह नवी मुंबई आणि रायगड परिसरात तब्बल २८ घरफोड्या केल्याची कबुली दिली आहे. त्यातील तिसरा संशयित ६ घरफोडीत तर चौथ्या संशयित एका घरफोडीत सहभागी असल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलिसांनी या चौघांची गुन्हेगारी पार्श्वभूमी तपासली असता ते सराईत गुन्हेगार असल्याचे स्पष्ट झाले. या चौघांवर वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात हाफ मर्डर, जबरी चोरी, घरफोडी सारखे तब्बल ३५ गंभीर गुन्हे दाखल आहेत.

या टोळीमध्ये मोहित कोळी आणि त्याची मैत्रीण स्वप्नाली उर्फ सोनू पाटील या प्रियकर-प्रेयसीच्या जोडीचा समावेश आहे. या बंटी-बबलीच्या जोडीने उरण परिसरात अनेक बंद घरांना लक्ष्य करत घरफोड्या केल्या होत्या. दिवसा बंद घरांची रेकी करायची आणि रात्रीच्या वेळी हात साफ करायचा अशी त्यांची पद्धत होती. चोरीतील मुद्देमाल विकून ते आपली हौस-मौज पूर्ण करत होते.

दुर्गा मातेला भावपूर्ण निरोप

नवरात्रौत्सवाचा जल्लोष पाहायला मिळाला. या कालावधीत दांडिया, गरबासह वेगवेगळे उपक्रम घेण्यात आले. तसेच, आरोग्य विषयक उपक्रमांसह खेळाच्या स्पर्धा आणि भजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. महिलांसाठीदेखील पैठणीसारख्या स्पर्धा घेण्यात आल्या. काही ठिकाणी गरब्यासह शिवकालीन पोवाड्यांचे आणि जाखडी या पारंपारिक नृत्यांचे सादरीकरण करण्यात आले. त्यामुळे हा सोहळा मंगलमय वातावरणात पार पडला.

त्यानंतर मंगळवारी (दि.२०) दुर्गा विसर्जनासह विजयादशमी (दसरा) साजरी करण्यात आली. यावेळी सकाळी विधीवत पुजा करून नवनवीन कपडे परिधान करून देवीची आरती घेण्यात आली. त्यानंतर स्थापन केलेले घट काढण्यात आले. सायंकाळी दुर्गा मूर्तींच्या विसर्जनाची तयारी करण्यात आली. गावासह शहरी भागातून देवीच्या मूर्तींची खालूबाजासह ढोल ताशांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत अनेकांनी सहभागी होऊन आनंद साजरा केला. यावेळी जिल्ह्यातील तलाव, नदी व समुद्रांमध्ये १ हजार ३३४ दुर्गा मुर्ती आणि १९२ प्रतिमांचे विसर्जन करण्यात आले. काही ठिकाणी सायंकाळी साडेसात ते रात्री १० वाजेपर्यंत विसर्जन सोहळा सुरू होता.

अशोक विजयादशमी निमित्त जिल्ह्यात जल्लोष

रायगड जिल्ह्यामध्ये मंगळवारी (दि.२०) बौध्द समाजाच्यावतीने अशोक विजया दशमी आणि धम्म चक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने जिल्ह्यात जल्लोष साजरा करण्यात आला. जिल्ह्यातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून वेगवेगळ्या संस्था संघटनांच्या वतीने अभिवादन करण्यात आले. जिल्ह्यातील बुध्द विहारामध्ये बुध्द वंदना घेण्यात आली.अशोक विजया दशमी आणि धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे महत्व पटवून देण्यात आले. अशोक विजयादशमी का साजरी केली जाते, याची माहिती वेगवेगळ्या मान्यवरांमार्फत देण्यात आली. बौध्द समाजातील विजयादशमीचे महत्व आणि क्रांतीकारी स्थान का आहे, याचीदेखील माहितीदेऊन उपस्थितांना संबोधित केले.

जिल्ह्यात सात ठिकाणी रावण दहन

विजयादशमीच्या (दसरा) दिवशी रायगड जिल्ह्यात सात ठिकाणी रावण दहन केले. रावणाची प्रतिकृती तयार करून अलिबाग तालुक्यातील चिंचोटी, चेंढरे, नागोठणे, महाड, झिराड या ठिकाणी त्यांचे दहन केले. हा सोहळा पाहण्यासाठी ९० हजारहून अधिक नागरिकांनी गर्दी केली होती. वाईटावर चांगल्याचा विजय म्हणून रावण दहनाची भव्य परंपरा जपण्यात आहे. यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनदेखील मोठ्या प्रमाणात करण्यात आले. अलिबाग तालुक्यातील चिंचोटी गावाने गेल्या अनेक वर्षाची रावण दहनाची परंपरा आजही मोठ्या उत्साहात जपली.

टोरंट प्रकल्पासाठी लाखो झाडांची कत्तल

सोहळा दि.३ नोव्हेंबर रोजी होण्याची शक्यता आहे. त्यावेळी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे येणार असल्याची चर्चा आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या परिसराची हवाई सफर देशाचे पंतप्रधान करू शकतात आणि त्यामुळे धरणाच्या बुडीत क्षेत्रातील झाडांची तोड टोरंट कंपनी प्रशासनाने हाती घेतली आहे.

यावेळी टोरंटकडून सायडोंगर परिसरातील आदिवासी वाडीपासून पुढील जंगलात इलेक्ट्रिक कटर यांच्या सहाय्याने झाडे तोडली जात आहेत. त्यावेळी तोडण्यात येत असलेली झाडे तेथून उचलण्यास देखील कामगार लावण्यात आले आहेत. शंभर वर्षे आणि त्याहून जुनी झाडे तोडली जात असून, त्या ठिकाणच्या संपूर्ण परिसरात कोणत्याही झाडाच्या अडथळा नसल्याचे दाखवता यावे यासाठी सर्व झाडे तोडली जात आहेत. मात्र, येथील ६४० हेक्टर जमिनीवरील झाडे लावण्याचे कोणतेही नियोजन नाही. तसेच, वन विभागाने जमीन प्रकल्पाला दिल्याचे कोणतेही पत्र वन विभाग स्थानिकांना देत नाही. तसेच, असे कोणतेही पत्र आतापर्यंत सोशल मीडियावर देखील दिसून आलेले नाही आणि असे असताना झाडे तोडली जात आहेत. त्यामुळे कर्जत पर्यावरण बचाव समिती आक्रमक झाली आहे.

तहसील कार्यालयात शेतकऱ्यांची ससेहोलपट

त्याच जमीनीत मातीचा भराव करून उंच संरक्षण भिंत बांधण्यात आली आहे. त्यामुळे नारायण जाधव यांच्या शेताकडे जाण्याचा पुर्वपरंपरागत मार्ग बंद झाला आहे. भरावामुळे पिकती जमीन देखील नापीक झाली आहे. त्यामुळे मालकीच्या शेतात पाऊलही ठेवता येत नाही, असा आरोप जाधव यांनी केला आहे. कसदार जमीन ओसाड पडल्यामुळे मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. अखेर नारायण जाधव या शेतकऱ्यांनी अलिबाग तहसील कार्यालयापासून महसूल मंत्री यांच्यापर्यंत जाऊन न्यायासाठी दाद मागितली. मात्र, तहसील कार्यालयाकडून फक्त कागदी घोडे नाचवले जात असल्याचा आरोप त्यांच्याकडून होत आहे. परंपरागत वहिवाटीचा रस्ता सुरु करून देण्याची कार्यवाही होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे. अलिबागच्या तहसीलदारांकडून फक्त तारीख आणि सुनावणी लावून वेळकाढूपणा करीत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. त्यामुळे संतप्त शेतकऱ्याने तहसीलदारांसह मंडळ अधिकारी यांच्या विरोधात आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.

दसऱ्यानिमित्त बाजारात तेजीचे वातावरण

खरेदीतून करोडोची उलाढाल झाल्याचे सांगण्यात आले.

तसेच, रायगड जिल्ह्यामध्ये वेगवेगळ्या शोरुमध्ये वाहन खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी दिसून आली. यंदा होन्डा, हिरो शोरुमधून दुचाकी मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यात आल्या. वाहन खरेदी केल्यावर त्यांना हार घालून, पुजा करून वाहनांसमवेत अनेकांनी सेल्फी व फोटो काढून सोशल मिडीयावर ते व्हायरलदेखील केले. दसऱ्याला नवीन वाहन दारात यावे, यासाठी गेल्या अनेक दिवसांपासून बुकिंग करण्यात आली होती. दसऱ्याच्या मुहूर्तावरही मोठ्या प्रमाणात बुकिंग झाले. यामुळे सर्वच वाहनांच्या शोरुम्समध्ये गर्दी होती. यंदा जिल्ह्यामध्ये ४००हून अधिक दुचाकी खरेदी झाल्या असून, शंभरहून अधिक चारचाकी वाहने खरेदी करण्यात आली. गेल्या वर्षीच्या तुलनेने दुचाकी खरेदीत काही कंपन्यांमध्ये यंदा २० टक्क्याने वाढ तर काही कंपन्यांमध्ये घट झाली असून, दुचाकीपेक्षा चारचाकी विशेष करून कार खरेदीवर ग्राहकांनी कल दिला असल्याचे पहावयास मिळाले. तसेच, पेट्रोलवर चालणाऱ्या दुचाकीला ग्राहकांनी अधिक पसंती दर्शविली असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.

त्याचबरोबर ग्राहकांसाठी विविध इलेक्ट्रॉनिक दुकानांत टीव्हीसह इतर विजेवर चालणाऱ्या उपकरणांवर सवलत लागू करण्यात आली होती. त्यामुळे विजेवर चालणाऱ्या वस्तूंच्या खरेदीसाठी देखील बाजारात गर्दी झाली होती. यावेळी काहींनी टीव्ही, फ्रिज आणि एसी सारखे उपकरणे अधिक खरेदी केल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात आले.

दसरा मेळाव्यातून ठाकरेंचा हल्लाबोल

हा भगवा आता महाराष्ट्रातच नव्हे तर दिल्लीतही फडकावायचा आहे. असेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, अभिनेता टायगर श्रॉफवर हल्ला झाल्याची घटना घडली. त्यानंतर हे चमको (एकनाथ शिंदे) लगेच भेटायला गेले. हा हल्ला झाला, त्यानंतर पोलिसांनी ते हल्लेखोर देखील पकडले. मग त्याचं कौतुक करायचे की आणखी काही? टायगर श्रॉफचं सुदैव, तो वाचला. पण गोळी जर आणखी वरती लागली असती आणि मग पोलिसांनी ते गुंड पकडलेही असते तरी त्याचा उपयोग काय? कोणत्या पद्धतीने तुम्ही सरकार चालवता? संताप फक्त याच गोष्टीचा येतो की त्यांनी स्वतःची फक्त धुणी भांडी करणं बाकी ठेवलं आहे. अन्यथा बाकी सगळी कामे पोलिसांना दिली आहेत, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली. काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र सरकारने उच्च न्यायालयात एक दावा केला. त्यात त्यांनी महाराष्ट्र हे शहरी नक्षलवाद्यांचे केंद्र बनल्याचे म्हटले आहे. महाराष्ट्रातील कोणत्या शहरांत नक्षलवाद आहे, हे सांगा. हे गुंड तुमच्या उत्तर प्रदेश वैगेरे तिकडून आले आहेत. हे येताना तुम्हाला कळलं नाही का? त्याच्याही वरती तो लॉरेन्स बिश्नोई साबरमती जेलमध्ये बसला आहे आणि त्याचे गुंड सांगतात की आमच्याकडे ७० हजार शूटर्स आहेत. देवेंद्र फडणवीसजी तुमच्यात जर खरंच हिंम्मत असेल, तर तिकडे साबरमतीला जा आणि तुमचा जो बाप तिकडे दिल्लीत बसला आहे, त्याच्यासमोर त्या लॉरेन्स बिश्नोईला खेचून आणा आणि मग गप्पा मारा, असे आव्हान उद्धव ठाकरे यांनी दिले आहे.

सुषमा अंधारेंची जहरी टीका

''शिंदेंचे दलाल चारा छावण्यांमध्ये दलाली सुरु करतील, म्हणून आम्हाला चारा द्या,'' अशी टीका ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी केली. आमची जगण्या मरण्याची झुंज लागली आहे. तर, शिंदे फडणवीस यांची खुर्चीसाठी झुंज लागल्याचे अंधारे म्हणाल्या. देवेंद्रजी आम्हाला काटकसर करायला लावता आणि तिथे दरेकर गरबा खेळण्यावर करोडो रुपये खर्च करतात. गोरट्यांल पैसे उधळत नाचतोय, असे म्हणत अंधारेंनी जोरदार हल्लाबोल केला. तसेच, ६०० पिएसआय १८ लाख रुपये घेऊन भरल्याचा आरोप देखील अंधारे यांनी केला. बिष्णोई गँग देवेंद्र फडणवीस तुम्हाला वाकोल्या दाखवत आहेत, असी टीका देखील अंधारेंनी केली. बिष्णोई गँग ग्रहमंत्रीपदाची लायकी काढतेय. तुम्ही काय केलं देवेंद्रजी असा सवाल अंधारेंनी केला. जेलमध्ये बसून लॉरेन्स बिष्णोई गँग चालवतो, असेही अंधारे म्हणाल्या. अन्वर बिष्णोई हा दिल्लीत आहे, तिथे भाजपची सत्ता आहे असेही त्या म्हणाल्या.

अमित शाहाच लॉरेन्स बिष्णोई

शिवसेना एकच, ती बाळासाहेब ठाकरेंची. समोर जो दिसतोय तो बिकाऊ माल आहे, असे म्हणत ठाकरेंच्या शिवसेनेच खासदार संजय राऊत यांनी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेतील दसरा मेळाव्यावर टीका केली. तिकडे विचार नाही, संघर्ष नाही, कुठली भूमिका नाही, इकडे महाराष्ट्र धर्म आहे, विचार आहे, असे म्हणत मुंबईतील गुंडगिरी, अंडरवर्ल्डवर बोलताना थेट गृहमंत्री अमित शाहांवर जोरदार हल्लाबोल केला. या देशाचा गृहमंत्री, ज्यांच्यावरती देशाच्या कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी आहे, तो एक माफिया आहे. लॉरेन्स बिष्णोईचे नाव आहे, पण या देशातील सगळ्या गुंडाच्या टोळ्या अमित शाहांच्या नेतृत्वात सुरू आहेत. अमित शाह हेच लॉरेन्स बिष्णोई आहेत, अशा शब्दात संजय राऊत यांनी अमित शाहांवर जोरदार हल्लाबोल केला. पुढे ते म्हाणाले, मला लोकं विचारतात हे सरकार कधी जाईल. आता, मी तुमचा मुहूर्त सांगतो तुम्ही कधी जाणार, एप्रिल महिन्याच्या शेवटी मोदी जाणार, ज्ञानू तर गेलाच, असे म्हणत एप्रिल २०२७ मध्ये मोदी सरकार कोसळणार असल्याचे त्यांनी म्हटले.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतींचे विद्यमान मालक श्री. वैभव मारुती पाटील रा.चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड. व श्री.योगेश नरेंद्र मेहता रा.अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड यांचे कडून कायम विकत घेण्याचे ठरविलेले असून त्या मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु. पैसे)
कांटी, ता.रोहा, जि.रायगड.	२४/१/५	१.८७.६०	०.७८

तरी सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, गहाण, दान, लिज, पोटगी, साठेकरार, मेन्टेनन्स, मेहेर, कर्ज, बयाणापावती, लीन, चार्ज, बक्षीस, मृत्यूपत्रांकीत दान वगैरे असल्यास अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकती संबंधीच्या लेखी प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार याप्रकारे यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत आणून द्यावी. ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दि.२०/१०/२०२६.

ॲड. मनोज प्रभाकर पाटील
शॉप नं.११, भास्कर को.ऑप.हौसि. सोसा.,
रामनाथ रोड, चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड.
मो. ९७६३३१९७००

निवडक



नगरपालिकेची कारवाई केवळ दिखाव्यापुरतीच

पेण : पेणमधील अंतोरा रोडवरील एसटी स्टँडच्या मागील बाजूस असलेल्या अति धोकादायक आशीर्वाद इमारतीतील गाळेधारकांना सोमवारी (दि.१२) ऑक्टोबर रोजी बाहेर काढून गाळे सील करण्यात आले होते. मात्र, आता हेच गाळे पुन्हा सुरू झाले असून तेथे भाजीविक्रीची दुकाने थाटण्यात आल्याचे दिसत आहे. इमारतीतील सर्व रहिवाशांना सुरक्षिततेच्या कारणास्तव खाली करण्यात आले असताना, त्याच इमारतीतील गाळ्यांमध्ये भाजीविक्री कशी सुरू आहे? नगरपालिकेची कारवाई केवळ कागदोपत्रीच आहे का? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित होत आहे. अति धोकादायक इमारतीत पुन्हा व्यवसाय सुरू होत असताना नगरपालिका प्रशासन नेमके काय करत आहे? या विक्रेत्यांना कोणाचे अभय आहे का, असाही प्रश्न उपस्थित होत आहे. भविष्यात एखादी दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार? याचे उत्तर प्रशासनाने द्यावे. केवळ कारवाईचा देखावा न करता नगरपालिका प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी होत आहे.



दसऱ्याच्या मुहूर्तावर वाहन खरेदी उत्साहात

खांदा कॉलनी : विजयादशमी अर्थात दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर नवीन वाहन खरेदी करण्यासाठी पनवेलमधील विविध वाहनांच्या शोरूममध्ये नागरिकांची लगबग पाहायला मिळत आहे. दसरा हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक शुभमुहूर्त मानला जात असल्याने अनेक कुटुंबांनी वाहन खरेदीला प्राधान्य दिले आहे. दुचाकीपासून चारचाकीपर्यंत विविध प्रकारची वाहने खरेदी करण्यासाठी सकाळपासूनच ग्राहक शोरूममध्ये दाखल होत आहेत. नवीन वाहनाची पूजा करून ते घरी नेण्याची उत्सुकता लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत संपूर्ण कुटुंबामध्ये दिसून येत आहे. काही कुटुंबे पहिल्यांदाच वाहन खरेदी करत असून, काही जण जुन्या वाहनाच्या जागी नवीन वाहन घरी आणत आहेत. वाहन निवडणे, कागदपत्रांची पूर्तता करणे आणि वाहनाची सजावट करून ते घरी नेणे, यामध्ये ग्राहक व्यस्त असल्याचे चित्र दिसत आहे.दसऱ्याच्या मुहूर्तावर वाहन खरेदी करणे शुभ मानले जात असल्याने या दिवशी नवीन वाहन घरी आणण्याची परंपरा अनेक कुटुंबे जपत आहेत. आपल्या कुटुंबाच्या गरजेनुसार आणि आर्थिक क्षमतेनुसार वाहन निवडण्याकडे ग्राहकांचा कल आहे. नवीन वाहनाच्या स्वागतासाठी कुटुंबीयांमध्ये आनंदाचे वातावरण असून, वाहनपूजनानंतर कुटुंबासह घरी परतण्याचा आनंद ग्राहकांच्या चेहऱ्यावर दिसून येत आहे. दसऱ्याच्यानिमित्ताने पनवेलमधील वाहन बाजारात उत्साहाचे वातावरण दिसून येत होता.



पनवेलच्या सराफा बाजारात गर्दी

खांदा कॉलनी : विजयादशमी अर्थात दसऱ्याच्या साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या शुभदिनी सोने खरेदी करण्यासाठी पनवेलमधील सराफा दुकानांमध्ये सकाळपासूनच नागरिकांची गर्दी पाहायला मिळाली. सोन्याचे भाव गगनाला भिडले असले, तरी शुभमुहूर्तावर सोने खरेदी करण्याची परंपरा जपण्यासाठी महिला वर्गासह सर्वसामान्य ग्राहकांनी दागिन्यांच्या खरेदीला पसंती दिली. दसऱ्याच्या दिवशी सोने खरेदी करणे शुभ मानले जाते. त्यामुळे या दिवशी आपल्या ऐपतीनुसार सोने खरेदी करण्याकडे अनेकांचा कल असतो. काही ग्राहकांनी सोन्याच्या अंगठ्या, कानातील दागिने, तर काहींनी लहान वजनाच्या सोन्याच्या वस्तू खरेदी करण्यास प्राधान्य दिले. मात्र, मोठ्या वजनाचे दागिने घेण्याऐवजी कमी वजनाच्या वस्तू खरेदी करून दसऱ्याचा मुहूर्त साधण्याकडे ग्राहकांचा कल दिसून येत होता. विशेषतः महिला वर्गामध्ये दागिन्यांच्या खरेदीबाबत उत्साह दिसून आला. सोन्याचे भाव वाढत असतानाही दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर खरेदी करण्याची परंपरा कायम असल्याचे चित्र पनवेलमध्ये पाहायला मिळाला.

मच्छिमारांचे आर्थिक गणित कोलमडले

| रेवदंडा | प्रतिनिधी |

समुद्राच्या लाटांशी झुंज देत कष्टाने मासे पकडायचे, लाखो रुपयांची गुंतवणूक करून नौका समुद्रात उतरवायच्या आणि पदरात काय पडेल याची शाश्वती नसताना उदरनिर्वाहासाठी संघर्ष करायचा, अशी बिकट परिस्थिती रायगड जिल्ह्यातील मच्छिमारांवर ओढवली आहे. त्यातच डिझेलच्या वाढत्या दरांनी मासेमारी व्यवसायाचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले असून, मच्छिमारांच्या सहनशीलतेचा अंत झाला आहे. सवलतीच्या दरात डिझेल उपलब्ध करून देण्याच्या प्रमुख मागणीसाठी आता मच्छिमार संघटनांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे.



- डिझेलच्या वाढत्या दरांनी कंबरडे मोडले
- शासनाचे पारंपरिक व्यावसायिकांकडे दुर्लक्ष
- संघटनांनी घेतला आक्रमक पवित्रा

शासनाकडून प्रभावी निर्णयाची अपेक्षा

जिल्ह्यात सुमारे ४० मच्छिमार सहकारी संस्थांकडे डिझेल पंप असून, या संस्थांमार्फत सुमारे दोन हजार नौकांना डिझेलचा पुरवठा केला जातो. शासनाकडून वर्षाकाठी ४७ हजार ८४० किलोलिटर डिझेलचा कोटा मंजूर असल्याची माहिती देण्यात आली आहे. मच्छिमारांना सवलतीच्या दरात डिझेल उपलब्ध करून देण्याची जबाबदारी या सहकारी संस्थांवर आहे. मात्र, प्रत्यक्षात वाढत्या इंधनखर्चामुळे मासेमारी व्यवसायावर होणारा आर्थिक ताण कमी करण्यासाठी शासनाकडून प्रभावी निर्णयाची अपेक्षा व्यक्त होत आहे.

समुद्रातील मासळीची उपलब्धता, हवामानातील बदल आणि बाजारभाव यांवर मच्छिमारांचे उत्पन्न अवलंबून असते. त्यामुळे खर्च वाढला म्हणून उत्पन्न वाढते, असे चित्र नाही. अनेकदा समुद्रात जाण्यासाठी केलेला खर्चही भरून निघत नसल्याने मच्छिमारांसमोर आर्थिक संकट उभे ठाकले आहे.

एकीकडे वाढता इंधनखर्च, दुसरीकडे अनिश्चित उत्पन्न आणि त्यात नौकांची देखभाल, जाळ्यांची दुरुस्ती, कामगारांचा खर्च यांसारख्या वाढत्या आर्थिक जबाबदाऱ्या, अशा दुहेरी कात्रीत मच्छिमार अडकले आहेत. परिणामी, पारंपरिक मासेमारी व्यवसाय टिकवायचा कसा, असा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे.

मच्छिमारांच्या प्रश्नाकडे शासनाने आणखी दुर्लक्ष केल्यास त्याचे राजकीय परिणाम भोगावे लागतील, असा स्पष्ट संदेश महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघाने दिला आहे. येत्या आठ दिवसांत सवलतीच्या दरातील डिझेलबाबत ठोस निर्णय न झाल्यास आगामी सर्व प्रकारच्या निवडणुकांमध्ये सरकारविरोधात मतदान करण्याची भूमिका संघाने घेतली आहे. विजय गिदी यांनी दिलेल्या माहितीनुसार, संघाच्या सभेत हा निर्णय घेण्यात आला आहे.

निवडणुकीच्या काळात सर्वसामान्यांच्या प्रांवर आश्वासने देणाऱ्या सरकारला मच्छिमारांच्या रोजीरोटीच्या प्रश्नावर ठोस उपाययोजना करता येणार नाहीत का? समुद्रात जीव धोक्यात घालून देशाच्या अन्नव्यवस्थेला हातभार लावणाऱ्या मच्छिमारांना इंधनखर्चाच्या संकटातून बाहेर काढण्याची जबाबदारी शासनाची नाही का? डिझेलच्या वाढत्या दरांमुळे व्यवसायच परवडेनासा झाला, तर मच्छिमारांनी जगायचे कसे, असा सवाल आता उपस्थित होत आहे. रायगडच्या मच्छिमारांनी दिलेला आठ दिवसांचा अल्टिमेटम हा केवळ दरसवलतीचा प्रश्न नसून, संपूर्ण मत्स्यव्यवसायाच्या अस्तित्वाशी निगडित आहे. त्यामुळे केंद्र आणि राज्य सरकार या इशाऱ्याची कितपत दखल घेते, मच्छिमारांना दिलासा देण्यासाठी कोणता निर्णय घेते आणि त्याची अंमलबजावणी कधी होते, याकडे जिल्ह्यातील मच्छिमारांचे लक्ष लागले आहे. आता आश्वासनांची पुनरावृत्ती नको, तर प्रत्यक्ष निर्णय हवा; अन्यथा मच्छिमारांचा रोष निवडणुकीत व्यक्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शस्त्र पूजन...



● दसरा,विजयादशमीनिमित्त रायगड पोलीस मुख्यालयात पोलीस दलातील शस्त्र पूजन करण्यात आले.

अनधिकृत बांधकामांवर सिडकोचा हातोडा

हॉटेल्स, वॉशिंगसेंटर, चिकन दुकाने अतिक्रमणमुक्त

| पनवेल | प्रतिनिधी |

तळोजा नोडमधील अनधिकृत व्यावसायिक अतिक्रमणांविरोधात सिडकोने धडक कारवाई केली आहे. सेक्टर १, ४, ३४ आणि ३६ मध्ये राबविण्यात आलेल्या या मोहिमेत हॉटेल्स, वॉशिंग सेंटर्स, चिकन व भाजीविक्रीची दुकाने, रसवंतीगृहे, कंटेनरमधील कार्यालये आणि अन्य व्यावसायिक अतिक्रमणे हटविण्यात आली. या कारवाईत सुमारे ८,७०० चौरस मीटर क्षेत्र अतिक्रमणमुक्त करण्यात आले असून, सुमारे २५ स्टॉल्स निष्कासित करण्यात आले.

तळोजा नोडमधील सिडकोच्या मालकीच्या भूखंडांवर अनेक व्यावसायिकांनी अनधिकृतपणे बांधकामे करून व्यवसाय सुरू केले होते. या अतिक्रमणांविरोधात सिडकोच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने विशेष मोहीम राबविली. सेक्टर १ मध्ये सुमारे २०० चौरस मीटर जागेवर सुरू असलेले अनधिकृत हॉटेल आणि वॉशिंग सेंटर हटविण्यात आले. तसेच सेक्टर ४ मधील भूखंड क्रमांक २१ येथे सुमारे १,५०० चौरस मीटर जागेवरील चिकन व भाजीविक्रीची दुकाने, रसवंतीगृह, कंटेनरमधील कार्यालय आणि अन्य अतिक्रमणे हटविण्यात आली.



खारघरमध्ये धोकादायक जाहिरात फलक

| पनवेल | प्रतिनिधी |

खारघर शहरातील रस्त्यालगत उभारण्यात आलेल्या काही जाहिरात फलकांच्या दुरवस्थेमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. रौनक डव्हर्टायझिंग कंपनीच्या जाहिरात व्यवस्थेशी संबंधित असल्याचे सांगितले जाणारे काही फलक वाकलेल्या व खाली झुकलेल्या अवस्थेत आहेत, तर काही ठिकाणी विद्युत वायर उघड्या आणि अस्ताव्यस्त दिसत आहेत. या प्रकाराची दखल घेत शिवसेना (उबाठा) पक्षाचे खारघरचे माजी उपशहरप्रमुख नंदू वारुंगसे यांनी प्रशासनाकडे तातडीच्या कारवाईची मागणी केली आहे.

खारघरमधील रस्त्यालगत आणि दुभाजक परिसरात उभारलेले काही जाहिरात फलक रस्त्याच्या दिशेने झुकलेले असल्याने ते कोसळल्यास वाहनचालक आणि पादचाऱ्यांना धोका निर्माण होऊ शकतो. तसेच फलकांच्या खांबांजवळील उघड्या विद्युत तारांमुळे विद्युत सुरक्षेचा प्रश्नही गंभीर बनला आहे. त्यामुळे संबंधित फलकांची संरचनात्मक आणि विद्युत तपासणी करून आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्याची गरज आहे. संबंधित प्रशासनाने जाहिरात फलकांच्या परवानग्या, सुरक्षितता आणि देखभालीची तपासणी करावी, अशी मागणी केली आहे. नियमांचे उल्लंघन आढळल्यास जबाबदारांवर कारवाई करून धोकादायक फलकांची तातडीने दुरुस्ती किंवा आवश्यकतेनुसार हटविण्यात यावेत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. संभाव्य दुर्घटना घडल्यानंतर कारवाई करण्याऐवजी प्रशासनाने वेळीच पावले उचलून नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करावी, अशी मागणी उबाठा पक्षाच्या वतीने करण्यात येत आहे.



आईस्क्रीम फ्रँचायझीच्या आमिषाने तरुणाची फसवणूक

| पनवेल | प्रतिनिधी |

नॅचरल आईस्क्रीमची फ्रँचायझी मिळवून देण्याचे आमिष दाखवून उलवे येथील २४ वर्षीय बेरोजगार तरुणाची ६ लाख २४ हजार रुपयांची ऑनलाइन फसवणूक करण्यात आली. याप्रकरणी उलवे पोलीस ठाण्यात सायबर भामट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणात नीरज पाटील हा उलवे सेक्टर २३ येथे राहतो. नोकरीच्या शोधात असताना त्याला इन्स्टाग्राम आणि मोबाईलच्या माध्यमातून नॅचरल आईस्क्रीमची फ्रँचायझी देण्याचे आमिष दाखवण्यात आले. आरोपींनी कंपनीच्या नावाने बनावट ई-मेल आयडी तयार करून नीरजशी संपर्क साधला. व्यवसायातून चांगला नफा मिळेल असे सांगून त्याचा विश्वास संपादन केला.

त्यानंतर फ्रँचायझी देण्याच्या बहाण्याने आरोपींनी वेगवेगळी कारणे सांगून नीरजकडून ऑनलाइन पद्धतीने ६ लाख २४ हजार रुपये हस्तांतरित करून घेतले. पैसे भरल्यानंतर नीरजने नॅचरल आईस्क्रीमच्या मुख्य कार्यालयाशी संपर्क साधून खातरजमा केली. त्यावेळी गेल्या दोन वर्षांपासून कंपनीकडून अशा प्रकारची कोणतीही फ्रँचायझी दिली जात नसल्याची माहिती त्याला मिळाली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर नीरजने आरोपीशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; मात्र आरोपी टाळाटाळ करू लागले. अखेर नीरजने उलवे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

एमआयडीसीतून डिझेलची चोरी

| पनवेल | प्रतिनिधी |

तळोजा एमआयडीसी परिसरात उभ्या असलेल्या वाहनाच्या डिझेल टाकीतून २२० लिटर डिझेल चोरीला गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विकी साहू यांनी फोर ट्रेन स्टील कंपनीसमोरील रस्त्यावर आपले वाहन उभे केले होते. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने वाहनाच्या डिझेल टाकीतून तब्बल २२० लिटर डिझेल चोरून नेले.

अनोळखी व्यक्तीचा मृतदेह

| पनवेल | प्रतिनिधी |

कामोठे येथील जवाहर इंडस्ट्रीच्या कॅन्टीनजवळ एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आला आहे. या व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी कामोठे पोलिसांनी नागरिकांना पुढे येण्याचे आवाहन केले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जवाहर इंडस्ट्रीच्या कॅन्टीनजवळ हा इसम मृतावस्थेत आढळला. त्याला पनवेल उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले असता डॉक्टरांनी तपासून दाखल करण्यापूर्वीच मृत घोषित केले. याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू नोंद करण्यात आली आहे. मृत व्यक्तीचे वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे असून, शरीरयष्टी सडपातळ, उंची सुमारे १६७ सेंटीमीटर, चेहरा गोल, केस काळे आणि रंग निमगोरा आहे. मृताच्या अंगात फिकट गुलाबी रंगाचा शर्ट व पँट होती. या व्यक्तीबाबत कोणाला माहिती असल्यास किंवा तिची ओळख पटत असल्यास कामोठे पोलीस ठाण्याशी ८६५५३५४११४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस उपनिरीक्षक गणेश इंगळे यांनी केले आहे.



प्रथम क्रमांक

१) सौ. रश्मी अपुर्व पाटील, पेझारी
२) श्री. गजानन त्रिंबक म्हात्रे, थळ
३) श्री. योगेश प्रकाश वार्डे, रांजणपाडा-आवास
४) श्री. अनिल नारायण वर्तक, वरसोली
५) श्री. विनोद मेहेता, माणगाव
६) श्री. अजिंक्य शेळके, डोंगरी-मुरुड
७) श्री. पांडूरंग विष्णू घरत, लोणारे-थळ
८) श्री. पांडूरंग आरेकर, मुरुड
९) श्री. प्रथमेश दत्ताराम पाटील, दिवीपारंगी-अलिबाग
१०) श्री. चेतन संजय घरत, वरसोली-अलिबाग

द्वितीय क्रमांक

१) सौ. मितल राजेंद्र नाईक, रेवदंडा
२) श्री. संतोष खडतर, चेरवली-माणगाव
३) श्री. रोशन शिवराम म्हसकर, नार्पोली-पनवेल
४) श्री. प्रकाशदादा ठाकूर, झिराड
५) श्री. राजाराम दामोदर पाटील, डावळे-नागाव
६) श्री. मनोज सदाशिव भवारे, दहिवली-नेरळ
७) सौ. छाया विलास भिडे, पेण
८) मोंढे कुटूंब, मुनवली-अलिबाग
९) श्री. अनंत विष्णू पाटील, रामनाथ-अलिबाग
१०) श्री. समीर सावंत, तळवडे(गोठेघर) अलिबाग

विजेत्यांनी आपले बक्षीस २२ ऑक्टोबर ते २८ ऑक्टोबर २०२६ पर्यंत दु. १२ ते सायं. ४ या कालावधीत कृषीवल कार्यालयातून येऊन घेऊन जाणे.

टीप : विजेत्यांनी येताना आपले फोटो असलेले ओळखपत्र सोबत घेऊन येणे.

पत्ता : कृषीवल कार्यालय, वेश्वी, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०

घरपट्टी वाढीविरोधात ठिय्या आंदोलनाचा इशारा | नागरी प्रश्न सोडविण्याची मागणी

पाली-सुधागडात संघर्ष समिती आक्रमक

| सुधागड-पाली | प्रतिनिधी |

पाली शहरातील नागरिकांना मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात नगरपंचायत प्रशासन अपयशी ठरत असल्याचा आरोप करत प्रस्तावित घरपट्टी करवाढीविरोधात पाली-सुधागड संघर्ष समितीने आक्रमक भूमिका घेतली आहे. शुद्ध व नियमित पाणीपुरवठा, फिल्टर पाणीपुरवठा योजना, रस्त्यांवरील अतिक्रमणे आणि पार्किंगचे प्रश्न अद्याप प्रलंबित असताना नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक बोजा कशासाठी, असा सवाल समितीने उपस्थित केला आहे. या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास ढोल-ताशांच्या गजरात निषेध मोर्चा काढून नगरपंचायत कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्याचा इशाराही समितीने दिला.



पाली-सुधागड संघर्ष समितीचे पदाधिकारी १९ ऑक्टोबर रोजी विविध नागरी प्रश्न आणि प्रस्तावित घरपट्टी करवाढीविरोधात निवेदन देण्यासाठी पाली नगरपंचायत कार्यालयात गेले होते. मात्र, त्यावेळी निवेदन स्वीकारण्यासाठी जबाबदार अधिकारी उपस्थित नसल्याने समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली.

मुख्याधिकाऱ्यांशी संपर्क साधण्यात आला. त्यांच्या सूचनेनंतर उपस्थित अधिकाऱ्यांनी समितीचे निवेदन स्वीकारले. मात्र, कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी अधिकारी अनुपस्थित राहत असतील, तर नागरिकांची कामे कशी होणार, असा सवाल समितीने उपस्थित केला.

नियमित पाणीपुरवठा, पार्किंगचे प्रश्न सोडवा

पाली शहरातील नागरिकांना शुद्ध व नियमित पाणीपुरवठा करावा, फिल्टर पाणीपुरवठा योजनेची सद्यःस्थिती स्पष्ट करावी आणि प्रलंबित कामे पूर्ण करण्यासाठी कालमर्यादा जाहीर करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. त्याचबरोबर प्रमुख रस्ते, चौक आणि बाजारपेठेतील अतिक्रमणांवर नियमानुसार कारवाई करून योग्य पार्किंग व्यवस्था निर्माण करण्याची मागणीही समितीने केली आहे.

गावठी जेम्स बाँडना प्रश्न

अभिनेता जय हेमंत उर्फ टायगर श्रॉफवरील हल्ला मुंबईत पुन्हा एकवार माफिया टोळ्यांचे वर्चस्व वाढत असल्याचे लक्षण आहे. १९९०च्या दशकात अशीच खुनाखुनी मुंबईने पाहिली. तेव्हा अनेक कुकरेजासारखे अनेक बिल्डर, खटावसारखे अनेक उद्योजक आणि गुलशनकुमारसारखे अनेक हिंदी सिनेमावाले लोक मारले गेले. याखेरीज राकेश रोशनसारख्या अनेकांवर निव्वळ धमकावण्यासाठी हल्ले करण्यात आले. आता गेल्या चार वर्षात सलमान खान, रोहित शेट्टी यांच्यावर हल्ले झाले आहेत. तर बाबा सिद्दिकी या नेत्याची हत्या झाली. यामागे लॉरेन्स बिश्नोई नावाची टोळी असल्याचे सांगण्यात येते. कोण्या एका अनिल पंडित नावाच्या गुंडाने अमेरिकेतून सोशल मिडियावर तसा दावा केला आहे. टायगरवर रविवारी हल्ला झाल्यानंतर अवघ्या अठरा तासात चपळाईने कारवाई करून आरोपींना पकडण्यात आले. याबद्दल मुंबई पोलिसांचे करावे तेवढे कौतुक थोडे आहे. शोधायचे ठरवले तर मुंबई पोलिस कोणत्याही आरोपीला काही तासात पकडू शकतात असे पूर्वापार म्हटले जाते त्याचा पुन्हा एकवार प्रत्यय आला. अर्थात यातला शोधायचे म्हटले तर हा भाग महत्वाचा आहे. असो. मुंबई पोलिसांकडे पूर्वी खबऱ्यांचे चांगले जाळे होते. आता ते नसले तरी सीसीटीव्ही फूटेज हा मोठा मदतनीस तयार झाला आहे. शिवाय आजकाल कोणत्याही घटनेचे मोबाईलवर चित्रीकरण करणारे लोक जिकडेतिकडे मिळतात. त्यांच्याकडून एकदा हल्लेखोराचा चेहरा मिळाला की मुंबईभरातल्या रस्त्यांवरच्या आणि रेल्वेतल्या सीसीटीव्ही फूटेजमधून तो शोधणे शक्य असते. या चेहऱ्याची व्यक्ती जिथे जिथे दिसेल ते फूटेज पाहिले जाते व त्या आधारे तिच्या हालचाली ठरवल्या जातात. टायगरच्या हल्लेखोरांचा मागही असाच काढला गेला. त्याच्या आधारे ते कांदिवलीपर्यंत लोकलने व नंतर उबरने सूरतला गेले हे शोधले गेले. याच रीतीने पुढील तपास व्हावा व पुरावे गोळा करून या पूर्ण टोळीला खणती लावली जावा अशी अपेक्षा आहे. प्रत्यक्षात गोळीबार करणारे कंत्राटी मारेकरी पकडले जातात व त्यापुढे पोलिस सरकू शकत नाहीत हे वारंवार दिसले आहे.

बिश्नोईच्या तुरुंगातूनच कारवाया?

लॉरेन्स बिश्नोई गँगचे तब्बल ५६ कंत्राटी मारेकरी सध्या मुंबईच्या तुरुंगात आहेत. शिवाय देशभरात अनेक ठिकाणी आणखीही लोक पकडले गेलेले वा शिक्षा भोगत आहेत. खुद्द लॉरेन्स बिश्नोई हा गुजरातेत साबरमतीच्या तुरुंगात आहे. हा तुरुंग बराच कडेकोट आहे अशी त्याची जाहिरात केली जाते. खुद्द केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या गुजरात राज्यातला आणि त्यांच्या मतदारसंघातला हा तुरुंग आहे. तेथे जेरबंद असूनही बिश्नोई टोळीच्या कारवाया आटोक्यात येत नसतील तर काहीतरी गडबड आहे. टायगरवर हल्ला झाल्यावर त्या कोण्या पंडित गुंडाने याची जबाबदारी स्वीकारली असून सलमान खानला पुन्हा धमकी दिली आहे. खूप वर्षांपूर्वी राजस्थानात एका चित्रीकरणादरम्यान सलमान खान व इतर काही कलाकारांनी काळवीटाची शिकार केली होती. बिश्नोई समाजात या काळविटाला खूप मानले जाते. त्यामुळे राजस्थानातील बिश्नोई समाज भडकला असून त्यांच्या वतीने आपण सलमानला धडा शिकवणार आहोत असा अजब दावा हा लॉरेन्स बिश्नोई आणि त्याचे टोळीवाले करीत असतात. सलमानने केलेल्या गुन्ह्याबद्दल त्याच्याविरुध्द खटला चालू आहे. त्याचा निकाल लागेलच. त्याला शिक्षा करणे ही कोण्या टोळीवाल्याची जबाबदारी असू शकत नाही. अशी भाषा करणाऱ्याला सरकारने फटकावले पाहिजे. पण त्याला तुरुंगात शाही वागणूक मिळत असल्याच्या बातम्या येत असतात. बिश्नोई गँगचे भारतभरात किमान ७०० कंत्राटी मारेकरी उर्फ शूटर्स असल्याचे कॅनडाच्या पोलिसांनी म्हटले होते. हे भारतातील पोलिसांच्या कानावर आले असेलच. जर टायगरचे हल्लेखोर इतक्या चपळाईने पकडले जात असतील तर या कथित कंत्राटी लोकांपर्यंत पोचण्याला कोणती अडचण आहे हा प्रश्न आहे. काही वर्षांपूर्वी पुण्यात एका हॉटेलवर धमकी म्हणून गोळीबार करण्यात आला. इतरत्रही हल्ले झाले. त्यात कोणी एक शुभम लोणकर नावाचा मराठी तरुण असल्याचे आढळले. हरियाणा, गुरुग्राम, पंजाब, दिल्ली, राजस्थान इत्यादी ठिकाणीही यांनी हैदोस घातला आहे. दिल्लीतील शांततापूर्ण निदर्शने करणाऱ्या कॉकरोच जनता किंवा डाव्या कार्यकर्त्यांवर पोलिस त्वेषाने कारवाई करतात किंवा अमित शहा लगेच त्यांना अर्बन नक्षल म्हणतात. पण बिश्नोई टोळीवर कारवाई करताना मात्र यांचे हात कमजोर पडताना दिसतात.

यांचा कणा मोडा

बाबा सिद्दिकी प्रकरणाचा तपास होऊन खटला चालू आहे. पण आरोपींना शिक्षा होईलच वा झाली तर कधी होईल हे सांगता येत नाही. काल मुंबई पोलिसांनी झटपट कारवाई केली, पण त्याचे श्रेय मात्र राजस्थान आणि दिल्ली पोलिसांनी लाटण्याचा प्रयत्न केला. वास्तविक मुंबई पोलिसांनी दिलेल्या माहितीच्या आधारे कोटा रेल्वे स्थानकात आरोपींना अटक करण्यात आली. पण ही कारवाई जणू आपणच केली असे भासवून राजस्थान पोलिसांनी मोठी पत्रकार परिषद घेतली. भाजपच्या राज्यामध्ये असल्या श्रेयवादातच सगळी शक्ती वाया चालली आहे. बिश्नोई टोळीचा कणा का मोडला जात नाही हा प्रश्न या श्रेय घेणाऱ्यांना व त्यांच्या दिल्लीतील बॉस मंडळींना विचारायला हवा. ९० च्या दशकात मुंबईच्या अंडरवर्ल्डवर पोलिसांनी केलेल्या कारवाईनंतर इथल्या टोळ्या जवळपास संपल्या. आता बिश्नोई व त्यांचे गँगवाले अमेरिका, कॅनडा इत्यादी देशांमध्ये बसून कारभार करतात. गोल्डी ब्रारसोबत या टोळीचे भांडण झाले असे भासवण्यात येते. पण ते खरे नसून तोही यांनाच सामील आहे असे म्हणतात. हे लोक जगातील टॅक्स हेवन म्हणवल्या जाणाऱ्या देशांमध्ये बसून भारतात कारवाया करतात. त्यांना खतम करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरच कारवाई केली जायला हवी. अजित डोवाल नावाचे एक जेम्स बाँड पाकिस्तानातील दहशतवाद्यांचा कसा खातमा करीत आहेत याच्या खऱ्याखोट्या कहाण्या सांगून भाजपची भक्त मंडळी स्वतःवरच खूष असतात. त्यांच्यातलेच काही जण धुरंधरसारखे सिनेमे काढतात व धंदा करतात. पण बिश्नोईसारख्या तुलनेने कमी ताकदवाल्या टोळीचा बंदोबस्त या गावठी जेम्स बाँडांना व धुरंधरांना का करता येत नाही याचे उत्तर मोदी सरकारने दिले पाहिजे. हिंदी सिनेमात पाण्यासारखा पैसा वाहत असतो. शिवाय त्यातल्या प्रसिध्दीचा झगमगाटही आकर्षक असतो. त्यामुळे तिच्यावर वर्चस्व ठेवण्याचा मोह सर्वच टोळीवाल्यांना होत असतो. एकेकाळी दाऊद इब्राहिम आणि नंतर गुरु साटमने हे केले. दाऊदचा पैसा अजूनही इथे आहे असे म्हणून त्याच्या विरोधात धर्मयुध्द करण्याचा आव आज बिश्नोई टोळीवाले करीत असतात. त्यामुळे काही मूर्ख भाजप भक्तांना ही टोळी आपली वाटत असते. त्यामुळेच या टोळीला संरक्षण मिळते आहे की काय अशी शंका काही वेळेला निर्माण होते. या सर्व प्रश्नांची व शंकांची उत्तरे अमित शहा व देवेंद्र फडणवीसांच्या पोलिसांनी आपल्या कृतीतून द्यायला हवीत.

विचार

बिहारमध्ये मुलींची सुरक्षितता कुठे हरवली?

बिहारमध्ये जमुई, समस्तीपूर आणि बांका येथे मुलींवरील छेडछाड, मारहाण आणि लैंगिक अत्याचाराचे व्हिडीओ समोर आल्यानंतर महिला सुरक्षेचा प्रश्न देशभर नव्याने चर्चेत आला. यावरुन विरोधकांनी सरकारला घेरले असतानाच 'एनडीए'तील सहकारी चिराग पासवान आणि उपमुख्यमंत्री विजयकुमार सिन्हा यांनीही सरकारवर टीका केली. बिहारमध्ये सत्तेत आल्यानंतर राज्यकर्ते जुन्या टिकेला नव्याने सामोरे जाताना दिसत आहेत.

राही भिडे



बिहारच्या सत्ताधाऱ्यांसमोर सध्या सर्वात मोठे आव्हान राजकीय विरोधकांचे आरोप नाहीत, तर त्यांच्याच आघाडीतील आवाज आहेत. गेल्या काही दिवसांमध्ये अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या अनेक घटना समोर आल्या. जमुईमध्ये दहावीच्या विद्यार्थिनीला आणि तिच्यासोबत असलेल्या विद्यार्थ्याला रस्त्यावर अडवून मारहाण आणि छेडछाड केल्याचा व्हिडीओ समोर आला. त्यानंतर समस्तीपूरमध्येही मुलीला सार्वजनिक ठिकाणी त्रास दिल्याचा व्हिडीओ समोर आला. बांका येथील घटनेचाही व्हिडीओ चर्चेत आला. या घटनांनंतर बिहार सरकारच्या कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित झाले. घटना घडणे आणि सरकार अपयशी ठरणे या दोन गोष्टी एकच आहेत, असे सरसकट म्हणता येणार नाही. कोणत्याही राज्यात गुन्हे घडू शकतात. त्याहून महत्त्वाचे म्हणजे पोलिसांना माहिती मिळाल्यानंतर त्यांनी किती वेगाने कारवाई केली, पीडितेला संरक्षण मिळाले का, आरोपींना कायदेशीर प्रक्रियेत आणले का आणि अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी प्रतिबंधात्मक व्यवस्था उभी केली का, हे पाहणे आवश्यक आहे. बिहार पोलिसांनी जमुई प्रकरणात आरोपींना अटक केली आणि तपासासाठी 'एसआयटी' स्थापन करण्यात आली. राष्ट्रीय महिला आयोगानेही प्रकरणाची दखल घेऊन बिहारच्या पोलिस महासंचालकांना तातडीची कारवाई, आरोपींची ओळख आणि कालबद्ध तपास करण्याचे निर्देश दिले; मात्र प्रशासनाने नंतर केलेली कारवाई ही घटना घडण्यापूर्वीची सुरक्षा व्यवस्था किती प्रभावी होती, या प्रश्नाचे उत्तर देत नाही. मुलीला रस्त्यावर अडवून तिचा छळ करण्याइतपत आरोपींमध्ये निर्भयता निर्माण झाली असेल, तर पोलिसांचा धाक नेमका कुठे आहे, हा प्रश्न विचारावाच लागतो.

घटनेनंतर आता गुन्हेगार पकडले गेले, ही आवश्यक बाब आहे; पण त्यापूर्वी गुन्हा घडू नये यासाठी राज्य यंत्रणा कुठे होती, हा त्याहून मोठा प्रश्न आहे. या प्रकरणात सरकारची अडचण वाढवणारी बाब म्हणजे सत्ताधारी आघाडीतील परस्परविरोधी प्रतिक्रिया. संयुक्त जनता दलाच्या काही नेत्यांनी जमुईची घटना 'एकाकी' किंवा अपवादात्मक असल्याचा युक्तिवाद केला आणि पूर्वीच्या बिहारची कायदा-सुव्यवस्था आठवण्याचा सल्ला दिला. दुसरीकडे, भाजपच्या मंत्री श्रेयसी सिंह यांनी पोलिसांच्या कारवाईवर प्रश्न उपस्थित केला आणि व्हिडीओ समोर आल्यानंतरच प्रशासनाला हालचाल करावी लागली का, असा मुद्दा उपस्थित केला. राजकारणात 'पूर्वी काय झाले होते' हा युक्तिवाद सोपा असतो. बिहारमध्येही तोच जुना राजकीय खेळ सुरू झाला आहे. विरोधक सरकारला प्रश्न विचारतात, सत्ताधारी मागील सरकारच्या काळातील कायदा-सुव्यवस्थेची उदाहरणे देतात; पण एखाद्या मुलीवर आज अत्याचार झाला असेल तर २००५ पूर्वी बिहारमध्ये काय झाले, हे तिच्या सुरक्षेचा प्रश्न सोडवणारे उत्तर नाही. आज सरकारमध्ये कोण आहे, आज पोलिस यंत्रणा कोणाच्या नियंत्रणाखाली आहे आणि आज नागरिकांना सुरक्षितता कोण देणार, याचे उत्तर सत्ताधाऱ्यांनी द्यावे लागते. विशेषतः चिराग पासवान यांच्या भूमिकेने हा प्रश्न अधिक गंभीर केला आहे. 'एनडीए'तील मित्रपक्षाचे नेते आणि केंद्रीय मंत्री असलेल्या पासवान यांनी बिहारमधील कायदा-सुव्यवस्थेबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. महिलांवरील गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर त्यांनी सरकारकडून 'झिरो टॉलरन्स'ची मागणी केली आणि मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्याशीही चर्चा केल्याचे सांगितले. मित्रपक्षाचा हा 'घरचा आहेर' सरकारसाठी अधिक महत्त्वाचा आहे. कारण विरोधक सरकारवर टीका करणारच; पण सत्ताधारी आघाडीतीलच घटक कायदा-सुव्यवस्थेबाबत सार्वजनिक नाराजी व्यक्त करत असतील, तर सरकारने त्याकडे राजकीय हल्ला म्हणून न पाहता प्रशासनातील त्रुटींचा इशारा म्हणून पाहणे गरजेचे आहे. याहून पुढची बाब म्हणजे राज्यसभेतील भाजपचे खासदार शंभू शरण पटेल यांनी बिहारमधील 'पोलिसिंग'च ढासळल्याचे म्हटले. त्यांनी पोलिस यंत्रणेतील बदलांची मागणी करत गुन्हेगारांना कायद्याची भीती उरली नसल्याचे मत व्यक्त केले. सत्ताधारी पक्षाच्या खासदाराकडून अशी सार्वजनिक टीका होणे ही सरकारसाठी दुर्लक्षित करता न येणारी बाब आहे. बिहार सरकारसमोरील राजकीय विरोधाभास इथेच स्पष्ट होतो. एकीकडे 'सुशासन' हा सत्ताधारी आघाडीच्या राजकारणाचा महत्त्वाचा आधार आहे. दुसरीकडे, महिलांवरील अत्याचाराच्या घटना आणि त्यावरील प्रशासनाच्या प्रतिक्रियांमुळे त्या दाव्याची प्रत्यक्ष कसोटी होत आहे. 'सुशासन' म्हणजे केवळ आरोपींना अटक करणे नव्हे. पोलिसांना वेळेवर माहिती मिळणे, पीडितेला तातडीची मदत मिळणे, संवेदनशील प्रकरणात गोपनीयता राखली जाणे, तपास वेळेत पूर्ण होणे आणि न्यायालयीन प्रक्रियेला वेग मिळणे, या सर्वांचा समावेश सुशासनात होतो. जमुई प्रकरणात तर मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाच्या अधिकृत 'सोशल मीडिया' खात्यावर पीडित मुलगी आणि तिच्या कुटुंबाचा फोटो काही काळासाठी प्रसिद्ध झाल्याने आणखी वाद निर्माण झाला. तो फोटो हटवण्यात आला तरी मुख्यमंत्री कार्यालयातील कर्मचाऱ्याविरोधात गुन्हा दाखल झाला.

अल्पवयीन पीडितेची ओळख सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने ही बाब अत्यंत संवेदनशील आहे. आजच्या डिजिटल युगात गुन्ह्याचा व्हिडीओ व्हायरल होतो आणि मग प्रशासन हलते, अशी परिस्थिती निर्माण होणे चिंताजनक आहे. 'सोशल मीडिया' हा पोलिसांचा पर्याय होऊ शकत नाही. एखाद्या घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर आरोपी पकडले जाणे ही कारवाई आहे; पण पोलिसांच्या नियमित गस्तीत, स्थानिक माहिती व्यवस्थेत आणि तक्रारींच्या नोंदणीच्या प्रक्रियेत अशी यंत्रणा उभी करणे ही गुन्हा घडण्यापूर्वीच धोका ओळखता येईल, ही खरी प्रशासनिक जबाबदारी आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री विजयकुमार सिन्हा यांच्या जुन्या वक्तव्यांकडेही पहावे लागते. २०२२ मध्ये विरोधात असताना त्यांनी लखीसराय येथील बलात्काराच्या घटनेवर तत्कालीन सरकारवर तीव्र टीका केली होती. महिलांच्या सक्षमीकरणाच्या घोषणांचा आणि प्रत्यक्ष सुरक्षेचा संबंध जोडत त्यांनी सरकारला जाब विचारला होता. नंतर २०२४ आणि २०२५ मध्ये सत्तेत आल्यानंतरही त्यांनी गुन्हेगारांविरोधात कठोर कारवाई, आवश्यक असल्यास एन्काऊंटर आणि मालमत्ता जप्ती-बुलडोझर यासारख्या कठोर उपायांची भाषा केली. म्हणूनच आजचा प्रश्न व्यक्तीचा नसून सत्तेच्या सातत्याचा आहे. विरोधात असताना गुन्ह्यावर संताप व्यक्त करणे सोपे असते. सत्तेत असताना त्याच निकषाने स्वतःच्या प्रशासनाची तपासणी करणे कठीण असते; पण लोकशाहीमध्ये खरी कसोटी सत्तेचीच असते. विरोधक म्हणून केलेल्या आश्वासनांचे आणि सत्ताधारी म्हणून केलेल्या कामाचे अंतर जितके कमी, तितकी सरकारची विश्वासार्हता अधिक.

बिहारमधील सध्याच्या घटनांकडे केवळ निवडणुकीच्या राजकारणाच्या चष्म्यातून पाहणे धोकादायक आहे. विरोधकांना सरकारला घेरण्याची संधी मिळाली आहे, हे राजकीय वास्तव आहे; परंतु त्यापेक्षा मोठे वास्तव म्हणजे रस्त्यावरून जाणाऱ्या मुलीला सुरक्षित वाटते का, पालकांना मुलगी शिकवणीला पाठवताना भीती वाटते का आणि तक्रार केल्यानंतर पोलिस यंत्रणा तत्परतेने उभी राहते का हे प्रश्न आहेत. महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न 'भाजप विरुद्ध विरोधक', 'एनडीए विरुद्ध आरजेडी' किंवा '२००५ पूर्वी विरुद्ध २००५ नंतर' असा विभागून सोडवता येणार नाही. प्रत्येक सरकारने आपल्या कार्यकाळातील प्रत्येक घटनेची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. राजकीय श्रेयासाठी 'सुशासन' आणि संकटाच्या वेळी 'मागील सरकार' हा दुहेरी निकष नागरिकांना मान्य होऊ नये. बिहार सरकारने या घटनांकडे राजकीय बचावाची संधी म्हणून नव्हे, तर प्रशासनाच्या पुनरावलोकनाची संधी म्हणून पाहिले पाहिजे. महिला आणि मुलींच्या सुरक्षेसाठी संवेदनशील भागात पोलिस गस्त, तक्रारींवर तातडीची कारवाई, शाळा-महाविद्यालयांच्या मार्गांवर सुरक्षा, सायबर माध्यमातून व्हिडीओ प्रसारित करणाऱ्यांवर कारवाई, पीडितांची गोपनीयता आणि तपासाची वेळबद्धता यावर स्पष्ट कृती आराखडा आवश्यक आहे. कारण शेवटी प्रश्न एका घटनेचा नाही. बिहारमधील मुलीला संध्याकाळी रस्त्यावरून जाताना कायद्याचा आधार जाणवतो की भीती, हा खरा प्रश्न असा आहे. सरकारच्या घोषणांपेक्षा या प्रश्नाचे उत्तर अधिक महत्त्वाचे आहे. 'सुशासन' ही घोषणा नसून नागरिकांच्या रोजच्या अनुभवातून सिद्ध होणारी बाब आहे आणि महिलांच्या सुरक्षिततेच्या प्रश्नावर आज बिहारमध्ये त्या अनुभवाची परीक्षा अत्यंत कठोरपणे होत आहे.

चर्चा आजची

'ऑक्टोबर हिट'चा चटका

वैभव पाटील



परतीचा मान्सून कमकुवत असल्यामुळे तो न बरसताच राज्यातून पुढे जाण्याच्या तयारीत आहे. शुष्क कोरड्या वातावरणामुळे राज्यात उष्णतेची लाट सक्रिय झाली आहे. जिल्ह्यात ऑक्टोबर हीटचा तडाखा जबरदस्त जाणवत आहे. त्यामुळे हवामान शास्त्रज्ञांनी सावधानतेचा इशारा दिला आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते, यंदा ऑक्टोबर हीटचा ताप हा दरवर्षीच्या तुलनेत खूप लवकर म्हणजे १५ दिवस आधीच जाणवू लागला आहे. रात्रीचे तापमानदेखील वाढल्यामुळे अस्वस्थ करणारे वातावरण राज्यात तयार झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून उन्हाच्या झळा अधिक तीव्र झाल्या असून, जिल्ह्यात कमाल तापमान ३५ अंशांवर पोहोचले आहे. सध्याच्या ऑक्टोबर हिटमुळे दिवसा कडक उन तर रात्री गारवा राहात असताना, किमान-कमाल तापमानात मोठी तफावत निर्माण झाली आहे. गेल्या सहा दिवसांत शहराचे कमाल तापमान सातत्याने ३४ ते ३५ अंश सेल्सिअसच्या आसपास नोंदवले गेले आहे. वाढत्या उकाड्याने आणि तीव्र उन्हाने जिल्ह्यात चांगलेच घामाघूम होत आहेत. ऑक्टोबरच्या सुरुवातीपासून कोरडे आणि निरभ्र हवामान पाहायला मिळत आहे. गेल्या आठवड्याभराच्या तापमानाच्या पाऱ्याचा अंदाज घेतला असता, २ ऑक्टोबरला उच्चांकी ३५.१ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. दुपारच्या वेळेत उन्हाचा तडाख्यामुळे जनजीवनावर परिणाम होतो आहे.

संपूर्ण जिल्ह्यात ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीलाच उन्हाचा तडाखा वाढू लागला आहे. सकाळीच जाणवणारा उकाडा, दिवसभर असलेला दमटपणा आणि दुपारच्या वेळी अंगाची लाही लाही करणारे ऊन यामुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले आहेत. थंडीची चाहूल लागण्याची अपेक्षा असताना उलट वाढत्या तापमानामुळे 'ऑक्टोबर हिट'ची चर्चा गावागावांत सुरू झाली आहे. मात्र हा केवळ नैसर्गिक बदल नसून मानवनिर्मित पर्यावरणीय ऱ्हासाचेही गंभीर परिणाम असल्याची चर्चा आता जोर धरू लागली आहे. गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर बांधकामे, निवासी प्रकल्प, व्यावसायिक संकुले आणि सिमेंट-काँक्रीटच्या रस्त्यांचे जाळे वाढले आहे. विकासाच्या नावाखाली झाडे-झुडपे तोडली जात आहेत, डोंगर सपाट केले जात आहेत आणि मोकळ्या जागा वेगाने नष्ट होत आहेत. परिणामी परिसरातील नैसर्गिक शीतलता कमी होत असून उष्णता साठवून ठेवणाऱ्या काँक्रीटच्या संरचनांचे प्रमाण वाढल्याने तापमानात वाढ होत असल्याचे नागरिकांचे निरीक्षण आहे.

पर्यावरण अभ्यासकांच्या मते, झाडे, डोंगर आणि नैसर्गिक जलस्रोत हे परिसराचे नैसर्गिक वातानुकूलन यंत्र असतात. मात्र त्यांचे अस्तित्व कमी होत असताना उष्णतेचा प्रकोप वाढणे ही चिंतेची बाब आहे. पूर्वी हिरवाईने नटलेले अनेक भाग आता काँक्रीटच्या जंगलात बदलत चालले आहेत. विकासाच्या स्पर्धेत पर्यावरणाचा बळी दिला जात असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

वाढती बांधकामे, मोकळ्या जागांचा अभाव आणि हिरवाईचे घटते प्रमाण यामुळे वातावरणातील नैसर्गिक संतुलन बिघडत असल्याचे दिसून येत आहे. झाडे तोडून, डोंगर फोडून आणि जमिनीवर काँक्रीटचे आवरण चढवून विकासाची व्याख्या बदलली; पण त्याची किंमत आता सर्वसामान्य नागरिकांना उष्णतेच्या झळांमधून मोजावी लागत आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया काही ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केली.

वाढत्या उकाड्याचा परिणाम शेतीवरही स्पष्टपणे दिसू लागला आहे. पावसाळा संपताच अनेक शेतांमधील पाणीसाठे कमी झाले असून भातशेतीला आवश्यक ओलावा मिळत नाही. काही भागांत भाताची पिके पिवळी पडू लागल्याचे चित्र दिसत आहे. तोंडाशी आलेला घास हिरावून जाण्याची भीती शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. यंदा पावसाचे असमान वितरण आणि वाढते तापमान यामुळे शेतीसमोर नवे संकट उभे ठाकल्याची चर्चा ग्रामीण भागात सुरू आहे.

आरोग्याच्या दृष्टीनेही ही परिस्थिती धोक्याची ठरत आहे. ताप, सर्दी, खोकला, अंगदुखी, थकवा आणि निर्जलीकरणाच्या तक्रारी वाढत असल्याचे नागरिक सांगत आहेत. दुपारच्या वेळेत रस्त्यांवर वर्दळ कमी झाल्याचे चित्र दिसत असून अनेक जण घराबाहेर पडणे टाळत आहेत. वैद्यकीय तज्ज्ञांकडून अधिकृत आकडेवारी समोर येणे आवश्यक असले तरी वाढत्या उष्णतेचा नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याची भावना सर्वसामान्यांमध्ये आहे.

विशेष म्हणजे, पर्यावरण संवर्धनाच्या घोषणा आणि वृक्षारोपणाचे कार्यक्रम कागदोपत्री मोठ्या प्रमाणावर होत असले तरी प्रत्यक्षात झाडांची तोड, डोंगरांचे सपाटीकरण आणि नैसर्गिक संसाधनांवरील अतिक्रमणे थांबताना दिसत नाहीत. विकास आणि पर्यावरण यामधील समतोल राखण्यात यंत्रणा अपयशी ठरत आहे का, असा प्रश्न आता नागरिक विचारू लागले आहेत.हिरवाई नष्ट करून उभारलेल्या काँक्रीटच्या जंगलाचा फटका जिल्ह्यातील नागरिकांना बसत असल्याचे चित्र आहे. वाढती उष्णता, कमी होणारा पाऊस, संकटात आलेली शेती आणि आरोग्यावरील परिणाम या सर्व घटनांची साखळी एकाच वास्तवाकडे बोट दाखवत आहे. पर्यावरणाचा ऱ्हास थांबवून डोंगर, झाडे, मोकळ्या जागा आणि नैसर्गिक जलस्रोतांचे संरक्षण करण्यासाठी तातडीने ठोस पावले उचलली नाहीत, तर भविष्यातील परिस्थिती अधिक गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तापमानातील या मोठ्या तफावतीमुळे सर्दी, खोकला आणि तापासारख्या साथीच्या आजारांचे रुग्ण वाढले आहेत.

लोकसंसद

सवलतींचा लाभ की नैतिकतेचा ऱ्हास?

नवरात्रोत्सवाच्या काळात ऑनलाइन माध्यमातून नवीन कपडे खरेदी करून ते एक-दोन दिवस वापरल्यानंतर संबंधित आस्थापनांच्या रिटर्न अँड रिफंड पॉलिसीचा आधार घेत मोठ्या प्रमाणावर परत केले जात असल्याच्या बातम्या वाचनात आल्या. ही बाब केवळ व्यावसायिक व्यवस्थेचा गैरफायदा घेणारी नसून नैतिक मूल्यांच्या ऱ्हासाचेही द्योतक आहे.ग्राहकांना खरेदीबाबत समाधान न झाल्यास वस्तू परत करण्याची सुविधा मिळावी, या हेतूने अशा सवलती दिल्या जातात. मात्र, केवळ सणासाठी कपडे वापरून नंतर ते परत करणे म्हणजे या सुविधेचा जाणीवपूर्वक गैरवापर होय. अशा प्रकारांमुळे आस्थापनांचे आर्थिक नुकसान होण्याबरोबरच भविष्यात प्रामाणिक ग्राहकांसाठी परतावा नियम कठोर होण्याची किंवा ही सुविधाच मर्यादित होण्याची शक्यता आहे. शिवाय, परत आलेले कपडे आस्थापनांकडून पुन्हा विक्रीसाठी उपलब्ध करून दिले गेले, तर ते कपडे नवीन असल्याच्या समजुतीने खरेदी करणाऱ्या ग्राहकाची फसवणूक होण्याची शक्यता आहे. आपल्याला नवीन म्हणून मिळणाऱ्या पार्सलमध्ये दुसऱ्याने वापरलेले कपडे आले तर जे दुःख आणि संताप वाटेल, तेच दुसऱ्याच्या बाबतीत करताना आपल्या सद्सद्विवेकबुद्धीला प्रश्न का पडू नये? सणांचा आनंद क्षणिक असतो; पण आपल्या कृतीतून घडणारे संस्कार पिढ्यान्‌पिढ्या टिकतात. घरातील लहान मुले आणि तरुण पिढी मोठ्यांच्या कृतीतून शिकत असते. स्वतःसाठी प्रामाणिकपणाची अपेक्षा ठेवताना इतरांशीही प्रामाणिक राहणे, हाच खऱ्या नैतिकतेचा पाया आहे आणि आपल्या सद्सद्विवेकबुद्धीचा खरा कस आहे.

अनिकेत शेटे, पुणे

दिनविशेष

राष्ट्रीय पोलीस स्मृतिदिन



देशात दरवर्षी २१ ऑक्टोबर रोजी पोलीस स्मृती दिन साजरा केला जातो. पोलीस-निमलष्करी दलांशी संबंधित सर्व लोक हा दिवस पोलीस शहीद दिवस किंवा पोलीस परेड दिवस म्हणून ओळखतात. कर्तव्य बजावताना आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी हा दिवस दरवर्षी भारतभर साजरा केला जातो.

१९५९ मध्ये लडाखच्या हॉट स्प्रिंग भागात २० भारतीय सैनिकांवर चिनी सैनिकांनी हल्ला केला होता, त्या दिवसाच्या स्मरणार्थ पोलीस स्मृती दिन पाळला जातो, ज्यात दहा भारतीय पोलीस ठार झाले होते आणि सात जण तुरुंगात होते. त्या दिवसापासून आजतागायत २१ ऑक्टोबर हा शहीद जवानांच्या स्मरणार्थ पोलीस स्मृती दिन म्हणून साजरा केला जातो. तिबेटची चीनशी भारताची २,५०० मैल लांबीची सीमा आहे. २१ ऑक्टोबर १९५९ रोजी या सीमेच्या सुरक्षेची जबाबदारी भारतीय पोलिसांवर होती. २० ऑक्टोबर १९५९ रोजी, चिनी हल्ल्याच्या एक दिवस आधी, भारताने ईशान्य लडाखच्या हॉट स्प्रिंग्स भागात तिसऱ्या बटालियनची एक कंपनी तैनात केली. या कंपनीला तीन तुकड्यांमध्ये विभागून सीमा सुरक्षेची जबाबदारी देण्यात आली होती. नेहमीप्रमाणे या कंपनीचे सैनिक नियंत्रण रेषेवर गस्त घालण्यासाठी निघाले होते. २० ऑक्टोबर रोजी दुपारपर्यंत, तीनपैकी दोन तुकडीचे सैनिक परत आले. मात्र तिसऱ्या तुकडीचे सैनिक २१ ऑक्टोबरला सकाळपर्यंत परतले नाहीत. २१ ऑक्टोबरच्या सकाळपर्यंत परत न आलेल्या तुकडीतील सैनिकांना शोधण्यासाठी शोध मोहीम आखण्यात आली होती. ज्याचे नेतृत्व तत्कालीन ऊखज करम सिंह करत होते. या तुकडीत सुमारे २० सैनिक होते. करमसिंग घोड्यावर स्वार होता आणि बाकीचे सैनिक पायी चालत होते. पायी चाललेल्या सैनिकांची ३ वेगवेगळ्या गटात विभागणी करण्यात आली होती. शोध मोहिमेदरम्यान चिनी सैनिकांनी घात केला आणि डोंगराच्या मागून गोळीबार सुरू केला. आपल्या साथीदाराच्या शोधात निघालेले भारतीय सैनिक हल्ल्यासाठी तयार नव्हते. त्यांच्याकडे आवश्यक शस्त्रे नव्हती. या हल्ल्यात १० जवान शहीद झाले असून बहुतांश जवान जखमी झाले असून, ७ जणांची प्रकृती चिंताजनक आहे. मात्र चीन इथेच थांबला नाही, तर चिनी सैनिकांनी गंभीर जखमी सैनिकाला ताब्यात घेतले. उरलेले सैनिक कसेतरी तेथून पळून जाण्यात यशस्वी झाले. १३ नोव्हेंबर १९५९ रोजी शहीद झालेल्या १० पोलिसांचे मृतदेह चिनी सैनिकांनी परत केले. हॉट स्प्रिंग्समध्ये भारतीय लष्कराने त्या १० जवानांवर पूर्ण पोलीस सन्मानाने अंत्यसंस्कार केले. या शहीदांच्या स्मरणार्थ दरवर्षी २१ ऑक्टोबर रोजी भारतात पोलीस स्मृती दिन साजरा केला जातो. पोलीस स्मृती दिनी, देशाचे सुरक्षा दल, मग ते राज्य पोलीस असोत, केंद्रीय सुरक्षा दले असोत किंवा निमलष्करी दले असोत, सर्वजण मिळून हा दिवस साजरा करतात. सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या पोलीस महासंचालकांच्या वार्षिक परिषदेत १९६० साली पोलीस स्मृती दिनाची सुरुवात झाली. भारत सरकारने या घटनेत शहीद झालेल्या पोलिसांचा सन्मान करण्याचा निर्णय घेतला आणि देशासाठी प्राण गमावलेल्या या सर्व पोलिसांच्या स्मरणार्थ दरवर्षी २१ ऑक्टोबर रोजी स्मृती दिन साजरा करण्याचा निर्णय घेतला. त्याचबरोबर २००० पासून दरवर्षी या दिवशी पोलीस परेडचे आयोजन करून हुतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करण्याचा कार्यक्रम आयोजित केला जातो.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२१ ऑक्टोबर

१) श्रीम. विजया दत्ताराम म्हात्रे पिंपळभाट, अलिबाग, २१-१०-१९५४

२) श्रीम.अरूणा प्रभाकर घरत चेंढरे-अलिबाग, २१-१०-१९४८

३) श्री.मोहनलाल लालजी नागडा अलिबाग, २१-१०-१९५५

४) श्री.प्रकाश पांडुरंग प्रभू अलिबाग, २१-१०-१९६१

५) श्री.हेमंत खंडेराव राऊत अलिबाग, २१-१०-१९६१

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३०००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

आजचे अन्नदाते

डॉ.अदिती चंद्रहास भगत, अलिबाग

पुन्हा खैराची बेकायदा कत्तल

• वन विभागाने कारवाई करावी; शेतकऱ्यांची मागणी

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील भडवल येथील जंगलात लावण्यात आलेली खैराची झाडे पुन्हा एकदा बेकायदा तोडण्यात आली आहेत. याचवर्षी शेलू येथे वन विभागाने लावलेली मौल्यवान समजली जाणारी खैर जातीच्या झाडांची कत्तल करण्यात आली होती. दरम्यान, खैराची झाडे तोडण्यात येत असल्याने वन विभागाकडे स्थानिक जागरूक शेतकऱ्यांनी अर्ज केले आहेत.

कर्जत तालुक्यात वन संपदा असून या वनाचे रक्षण करण्यासाठी वन विभाग कार्यरत आहे. परंतु, सध्या या तालुक्यात मोठ्या प्रमाणात पर्यावरणाची हानी होताना पाहायला मिळत आहे. त्यातच भडवळ येथे शेतजमिनीच्या बांधावरील खैराची अनेक झाडे अज्ञात व्यक्तींनी तोडून चोरून नेल्याने तसेच भातशेतीचे नुकसान केल्याबाबत तक्रार अर्ज वन विभाग नेरळकडे करण्यात आली आहे. लक्ष्मण नाना शेळके, यांची ग्रामपंचायत दामत हद्दीतील सर्वे नं. २१४/२ व सर्वे नं.



२११/१/३/२ या शेतजमिनीच्या बांधावर खैराची झाडे होती. तसेच हेमंत काशिनाथ बैकर तसेच अन्य शेतकऱ्यांची शेताच्या बांधावर आणि मालकी जंगलात असलेली खैराचे झाडांची वृक्षतोड झाली आहे. १६ ऑक्टोबर रोजी रात्रीच्या सुमारास अज्ञात व्यक्तींनी बेकायदेशीररीत्या तोडली असून, ती झाडे चोरून नेण्यात आली. तसेच झाडे तोडताना व तोडलेली झाडे शेतामध्ये टाकल्यामुळे त्यांच्या भातशेतीचेही नुकसान झाले आहे. त्यामुळे त्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागले आहे.

खैर हा वृक्ष वन विभागाच्या मौल्यवान झाडांच्या यादीत आघाडीवरील झाड आहे. त्या खैर जातीच्या प्रकारची झाडे तोडून चोरून नेणाऱ्या अज्ञात व्यक्तींचा शोध घेऊन त्यांच्याविरुद्ध नियमानुसार योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी वन विभाग नेरळ यांना केली आहे. तसेच खैराची झाडे तोडल्यामुळे झालेल्या भातशेतीच्या नुकसानीची पाहणी करून नुकसानभरपाई मिळण्याबाबत नियमानुसार आवश्यक कार्यवाही करावी, यासाठी वन विभागाकडे अर्ज देण्यात आला आहे.

महाराष्ट्रात खैराला लाल चंदन म्हणून ओळखला जात आहे. खैराच्या वृक्षाला खूप मोठ्या प्रमाणात मागणी आहे. परंतु तेथील चोरटे लाकडे रात्रीच्या वेळी तोडून चोरी करण्याचा प्रकार कर्जत तालुक्यामध्ये सर्रास घडत आहेत. वन विभाग यांच्याकडून या वृक्ष तोडीबद्दल कारवाई होणे अपेक्षित आहे.

चोरी करणाऱ्यांवर कारवाई कधी?

शेलू येथील खैराची झाडे तोडून नेणाऱ्यांचे काय झाले? वन विभागाने शेलू बेडिसगाव येथील संरक्षित असलेल्या वन जमिनीवर खैराची मोठ्या प्रमाणावर झाडे लावली आहे. या झाडांना आज १५ वर्षे झाली आहेत. खैर हा वृक्ष मौल्यवान असल्याने त्यांचे आयुर्वेदिक महत्व लक्षात घेऊन वन विभाग झाडे लावते. पण जंगलातून चोरटी वाहतूक करणारे यांच्या मुसक्या वन विभाग आवळणार आहे की नाही? शेलू येथे खैराची झाडे तोडून अनेक महिने लोटली तरी अज्ञात व्यक्तींवर कार्यवाही शून्य अशी स्थिती आहे.

भिवपुरी रोड रेल्वे स्थानकातील लिफ्ट बंद

। नेरळ । प्रतिनिधी ।

भिवपुरी रोड स्थानकातील लिफ्ट बंद झाली आहे.स्थानकातील लिफ्ट बंद असल्याने ज्येष्ठ नागरिक तसेच महिला प्रवासी आणि दिव्यांगांची प्रचंड गैरसोय होत आहे. भिवपुरी रोड स्थानकातील लिफ्ट दुरुस्तीची भिवपुरी रोड रेल्वे प्रवासी संघटनेने केली आहे. या मागणीचे निवेदन अध्यक्ष किशोर गायकवाड यांची भिवपुरी रोड स्थानक प्रबंधक यांना दिले आहे.

मध्य रेल्वेवरील मुंबई-पुणे या मेन लाइनवरील भिवपुरी रोड रेल्वे स्थानकावरील कर्जत दिशेकडील लिफ्ट अचानक बंद पडल्यामुळे



रेल्वे प्रवाशांची गैरसोय होत आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग प्रवासी, महिला, लहान मुले आणि गुडघेदुखीचा त्रास असलेल्या प्रवाशांना याचा सर्वाधिक फटका बसत आहे. प्रवाशांच्या सुविधेसाठी स्थानकावर लिफ्टची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र, ही लिफ्ट वारंवार बंद पडत असल्यामुळे जिन्यांचा वापर करणे अनेक प्रवाशांसाठी अडचणीचे ठरत आहे. स्थानकावर लिफ्ट बंद असल्याबाबतची कोणतीही पूर्वसूचना देणारा फलक किंवा सूचना फलक तेथे लावण्यात आलेली नाही. तसेच, या प्रकरणाची दखल घेण्यासाठी त्यावेळेस कोणताही रेल्वे कर्मचारीही घटनास्थळी उपलब्ध नव्हता. विशेष म्हणजे यापूर्वी या लिफ्टमध्ये तांत्रिक बिघाड होऊन सुमारे ३५ ते ४० मिनिटे प्रवासी लिफ्टमध्ये अडकून पडल्याची गंभीर घटना घडली होती. वारंवार घडणाऱ्या या प्रकारामुळे प्रवाशांमध्ये रेल्वे प्रशासनाच्या कारभाराबाबत तीव्र संताप व्यक्त होत आहे.

बारा मजली इमारतीला आग

मुंबई : मुंबईतील कुर्ला येथे बारा मजली इमारतीला आग लागल्याची घटना मंगळवारी (दि.२०) सकाळी ६.५३ वाजता घडली. आगीमुळे इमारतीचे धूर पसरल्याने ९ जण गुदमरले असून त्यांना उपचारासाठी राजावाडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाने तात्काळ धाव घेत आग विझवण्यास सुरवात केली. अथक प्रयत्नांनी अग्निशमन दलाच्या जवानांना ७.२१ वाजता आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले.

गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

रसायनी : निर्मला फाउंडेशन, गुळसुंदे यांच्या वतीने एस.एस.सी. परीक्षा २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि गुणवंत शिक्षकांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांना शैक्षणिक व करिअरविषयक मार्गदर्शन मिळावे, त्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन मिळावे आणि सामाजिक बांधिलकी जपली जावी, हा यामागचा उद्देश होता. या कार्यक्रमात रसायनी परिसरातील नऊ शाळांमधील प्रथम तीन क्रमांक मिळविलेल्या एकूण २९ गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. रसायनी परिसरातील गुळसुंदे हायस्कूल, आपटे विद्यालय, सावळे विद्यालय, चावणे विद्यालय, वाशिवली विद्यालय, जनता विद्यालय (मराठी माध्यम), जनता इंग्रजी माध्यमिक विद्यालय आणि रिलायन्स फाउंडेशन स्कूल (मराठी माध्यम) यांसह नऊ शाळांमधील गुणवंत विद्यार्थ्यांना यावेळी गौरविण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी विशेष प्रयत्न करणाऱ्या तसेच शाळेची गुणवत्ता आणि भौतिक सुविधा सुधारण्यासाठी योगदान देणाऱ्या शिक्षकांचाही निर्मला फाउंडेशनच्या वतीने गुणवंत शिक्षक पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये निवास थळे, रा.जि.प. प्राथमिक शाळा, वावेघर; प्रवीण पाटील, सार्वजनिक विद्यामंदिर, साई; श्रुती कोरडे, रिलायन्स फाउंडेशन स्कूल, मराठी माध्यम, लोधीवली; आणि विलास पाटील, अनंत पांडुरंग भोईर विद्यालय, दापोली-पारगाव यांचा समावेश होता.

पनवेलमध्ये नवरात्रोत्सवाचा जल्लोष

। खांदेश्वर। प्रतिनिधी।

नवरात्रोत्सवाच्या शेवटच्या तीन दिवसांत पनवेल शहरातील विविध नवरात्रोत्सव मंडळांच्या परिसरात गरबा आणि दांडियाचा उत्साह शिगेला पोहोचला होता. रात्री बारापर्यंत रंगणाऱ्या गरब्याच्या तालावर ज्येष्ठ महिला, नागरिक, तरुण-तरुणी आणि लहान मुलांनी मनसोक्त ठेका धरला. ढोल-ताशांचा निनाद, गरब्याची गाणी आणि रंगीबेरंगी रोषणाईमुळे नवरात्रोत्सवाच्या वातावरणात उत्साहाचे रंग भरले होते.

पनवेल शहरासह नवीन पनवेल, खांदा वसाहत आणि परिसरातील विविध नवरात्रोत्सव मंडळांकडून गरबा आणि दांडियाचे आयोजन करण्यात आले होते.



नवरात्रोत्रोत्सवाच्या अखेरच्या टप्प्यात देवीच्या दर्शनासाठी तसेच गरब्यात सहभागी होण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. पारंपरिक गरब्यापासून आधुनिक संगीताच्या तालावर सादर होणाऱ्या नृत्यापर्यंत विविध प्रकारांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

गरब्यासाठी तरुणाईने विशेष तयारी केली होती. रंगीबेरंगी घागरा-चोळी, आकर्षक केडियू, कुर्ते, पारंपरिक दागिने आणि विविध प्रकारच्या वेशभूषेमुळे गरब्याच्या मैदानाला वेगळीच शोभा आली होती. काहींनी पारंपरिक गुजराती वेशभूषा, तर काहींनी आधुनिक फॅशनचा साज चढवला होता. लहान मुलांनीही आकर्षक पोशाख परिधान करून गरब्यात सहभाग घेतला. विशेष म्हणजे, या गरब्याच्या फेऱ्यांमध्ये ज्येष्ठ महिला आणि नागरिकांनीही उत्साहाने सहभाग घेतला.

परळीकरांच्या श्रमदानातून अंबा नदीवर बंधारा

। पाली । प्रतिनिधी ।

'आजचे पाण्यासाठीचे श्रम दान, उद्याचे ठरेल जीवनदान!' हे ब्रीदवाक्य उराशी बाळगून, ग्रुप ग्रामपंचायत परळी आणि समस्त ग्रामस्थ मंडळ परळी यांच्या संयुक्त विद्यमाने अंबा नदीवर नुकताच बंधारा बांधण्याचे काम यशस्वीरीत्या पूर्ण झाले. पाली पंचायत समिती सदस्या प्रणिता राजेश परदेशी यांच्या संकल्पनेतून तसेच ग्रामस्थांच्या अभूतपूर्व एकजुटीतून आणि श्रम दानातून हा बंधारा साकार झाला.

उन्हाळ्याच्या दिवसांत भेडसावणाऱ्या पाणीटंचाईवर मात करण्यासाठी परळी ग्रामस्थांनी एकत्र येत श्रमदानाचा मार्ग निवडला. या बंधाऱ्याच्या कामासाठी गावकऱ्यांनी



दाखवलेले सहकार्य, अहोरात्र केलेले श्रमदान आणि सातत्य खरोखरच कौतुकास्पद आहे.

या बंधाऱ्यामुळे परळी गावातील पिण्याच्या आणि वापराच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार आहे. गावाने एकत्र येऊन घेतलेले हे कष्ट आणि दाखवलेली एकजूट येणाऱ्या भावी पिढ्यांसाठी नक्कीच दिशादर्शक ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

अंबा नदीवरील बंधारा यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल सम स्त परळी ग्रामस्थांचे सर्व स्तरातून आभार व अभिनंदन व्यक्त करण्यात येत आहे. तसेच, गावातील ही विकासाची घोडदौड अशीच पुढे चालू राहो, अशी सदिच्छाही व्यक्त करण्यात आली.

वडिलांची हत्या

पालघर : पालघर पूर्व येथे कार खरेदीसाठी पैसे देण्यावरून झालेल्या वादातून २५ वर्षीय तरुणाने आपल्या वडिलांची हत्या केली. ही घटना रविवारी सायंकाळी सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास पालघर पूर्वेतील नवली रामनगर परिसरातील त्यांच्या फ्लॅटमध्ये घडली. मुकेश परमार असे आरोपीचे नाव असून, त्याने ग्राइंडरच्या साहाय्याने वडील मोहनलाल परमार (५९) यांचा गळा चिरला. वडिलांची हत्या केल्यानंतर मुकेश घटनास्थळावरून पळून गेला होता. या प्रकरणी आरोपी मुलाला गुजरातमधील भरूच येथून अटक करण्यात आली.



रोहा येथे श्री दुर्गादौड उत्साहात

। रोहा । प्रतिनिधी ।

रोहा शहरात रविवारी (दि.१८) पहाटे शिव प्रतिष्ठान हिंदुस्थान रोहा या संस्थेच्या वतीने श्री दुर्गादौड कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पहाटे सहा वाजण्याच्या सुमारास निघालेल्या श्री दुर्गादौडमध्ये भगवा ध्वज व छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष करत आणि आई भवानी मातेचा आशीर्वाद घेऊन शहरातील नागरिकांनी एकजुटीने दुर्गादौड कार्यक्रमात मोठ्या संख्येने उत्साहात सहभागी झाले होते. शहरातील श्रीराम मारुती चौकशेजारी असलेल्या दुर्गामातेच्या मंदिरापासून श्री धावीर मंदिरापर्यंत दुर्गादौड काढण्यात आली. यात परिसरातील धारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


मार्गिकांचा अंदाज घेणे सोपे होणार | वाहतूक शिस्तीला मिळणार बळ

महामार्गावर पांढऱ्या पट्ट्यांचे मार्किंग सुरू

। खांदेश्वर । प्रतिनिधी ।

सायन-पनवेल महामार्गावर रस्त्यावरील पांढऱ्या पट्ट्यांचे मार्किंग करण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. पनवेल ते मुंब्रा टोलनाक्यापर्यंत रस्त्यावर थर्मोप्लास्टिक पांढरे पट्टे आखण्यात येणार असल्याने वाहनचालकांना मार्गिकांचा अंदाज घेणे सोपे होणार आहे. या कामामुळे वाहनचालकांना आपले वाहन कोणत्या मार्गिकेतून चालवावे, याबाबत स्पष्टता मिळण्यास मदत होणार आहे.

महामार्गावरून दररोज मोठ्या प्रमाणात हलकी व अवजड वाहने धावत असतात. अनेक ठिकाणी रस्त्यावरील पट्टे अस्पष्ट झाल्याने



वाहनचालकांना मार्गिकांचा अंदाज घेण्यात अडचणी येतात. विशेषतः रात्रीच्या वेळी तसेच पावसाळ्यात रस्त्यावरील खुणा स्पष्ट दिसत नसल्याने वाहन चालवताना संभ्रम निर्माण होऊ शकतो. या पार्श्वभूमीवर पांढऱ्या पट्ट्यांचे मार्किंग महत्त्वाचे ठरणार आहे.

थर्मोप्लास्टिक पद्धतीने आखण्यात येणारे पांढरे पट्टे वाहनचालकांना मार्गिकांची सीमा ओळखण्यास मदत करतील. त्यामुळे एका मार्गिकेतून वाहन चालवण्याची शिस्त लागण्याबरोबरच अनावश्यकपणे लेन बदलण्याचे प्रकार कमी होण्यास मदत होऊ शकते. तसेच रस्त्याची रचना, मार्गिकांची संख्या आणि वाहन चालवण्याची दिशा समजणे अधिक सोपे होईल. सायन-पनवेल महामार्ग हा मुंबई, नवी मुंबई आणि पनवेलला जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. या महामार्गावरून प्रवासी वाहने, खासगी गाड्या, बस आणि अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणात वाहतूक होते. त्यामुळे रस्त्यावरील दिशादर्शक खुणा आणि मार्गिकांचे स्पष्ट मार्किंग सुरक्षित प्रवासासाठी आवश्यक आहे.

सुरक्षित प्रवासाला प्राधान्य देण्याचे आवाहन

मार्किंगचे काम पूर्ण झाल्यानंतर वाहनचालकांना रस्त्याचा वापर अधिक शिस्तबद्ध पद्धतीने करता येईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. मात्र, रस्त्यावरील पट्ट्यांसोबत दिशादर्शक फलक, रात्रीच्या वेळी दृश्यमानता आणि वाहतूक नियमांची अंमलबजावणी यांनाही तितकेच महत्त्व आहे. वाहनचालकांनी निर्धारित मार्गिकेतून वाहन चालवून सुरक्षित प्रवासाला प्राधान्य द्यावे, असे आवाहन या निमित्ताने करण्यात येत आहे.

निवडक



ममदापूर ते नेरळ दुर्गा माता दौड

नेरळ : विजयादशमीनिमित्त कर्जत तालुका हिंदू राष्ट्र संघटन यांच्या वतीने नेरळ परिसरात दुर्गा माता दौड काढण्यात आली होती. ही दुर्गामाता दौड ममदापूर गावातून नेरळ अशी काढण्यात आली होती. या दौडमध्ये नेरळ परिसरातील शेकडो तरुण सहभागी झाले होते. दरवर्षी दसरानिमित्त नेरळ परिसरातील शेलू आणि ममदापूर ते नेरळ अशी दुर्गामाता दौड काढण्यात येते. त्यानुसार नेरळ परिसरातील हिंदू राष्ट्र संघटनेच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येत दुर्गामाता दौडचे आयोजन केले होते. हिंदू राष्ट्राचा जयजयकार करीत ही दुर्गामाता दौड निघाली. या दुर्गामाता दौडची सुरुवात ममदापूर गावातील हनुमान मंदिर येथून झाली. ममदापूर गावातून खांडा गावातून ही दौड नेरळ टॅक्सी स्टँड अशी नेरळ बाजारपेठ येथून हनुमान मंदिर येथे पोहचली. हनुमान मंदिर येथे महाआरती झाल्यानंतर दुर्गामाता दौडची सांगता झाली. या दौडमध्ये असंख्य तरुण भगवे फेटे परिधान करून उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.



कन्यापूजन सोहळा उत्साहात

रसायनी : नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून मोहोपाडा येथील श्री दत्त मंदिराच्या सभामंडपात आंतरराष्ट्रीय बजरंग दलाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला भव्य कन्यापूजन सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्यात दुर्गादेवीचे स्वरूप मानल्या जाणाऱ्या जवळपास २४० कन्यांचे त्यांच्या माता-पित्यांच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात आले. या उपक्रमातून भारतीय संस्कृतीतील कन्यापूजनाचे महत्त्व अधोरेखित करत नारीशक्तीप्रती आदर व्यक्त करण्यात आला. पूजन करण्यात आलेल्या सर्व कन्यांना आंतरराष्ट्रीय बजरंग दलाच्या वतीने भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बिना रेगे यांच्या सुमधुर आवाजातील भक्तिमय गायनाने झाली. त्यांच्या सुरेल सादरीकरणामुळे कार्यक्रमस्थळी भक्तिमय वातावरण निर्माण झाले. त्यानंतर दुर्गाशक्तींच्या वतीने 'लव्ह जिहाद' या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी महिला व मुलींची सुरक्षितता, सामाजिक जागरूकता आणि संभाव्य धोक्यांबाबत सजग राहण्याचे आवाहन उपस्थितांना करण्यात आले.



पोलीस आयुक्तालयात शस्त्रपूजन

खांदेश्वर : विजयादशमी अर्थात दसरा सणानिमित्त कळंबोली येथील नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात मंगळवारी (दि.२०) शस्त्रपूजनाचा सोहळा पार पडला. यावेळी पोलीस विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पोलीस दलातील शस्त्रांचे विधिवत पूजन करून कर्तव्याप्रती निष्ठा आणि नागरिकांच्या सुरक्षेचा संकल्प व्यक्त केला. दसऱ्याच्या दिवशी शस्त्रपूजन करण्याची परंपरा आहे. अन्याय आणि दुष्ट प्रवृत्तींवर विजय मिळविण्याचे प्रतीक म्हणून या सणाकडे पाहिले जाते. याच परंपरेनुसार नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात शस्त्रास्त्रांची स्वच्छता करून त्यांचे पूजन करण्यात आले. पोलीस दलाकडे कायदा व सुव्यवस्था राखण्याची, गुन्हेगारीला आळा घालण्याची आणि नागरिकांचे संरक्षण करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे. कोणत्याही संकटाचा सामना करण्यासाठी पोलीस दल सज्ज असून, नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल, असा निर्धार या निमित्ताने व्यक्त करण्यात आला. शस्त्रपूजनाच्या निमित्ताने पोलिसांच्या कर्तव्यनिष्ठेचे आणि जनतेच्या संरक्षणासाठी असलेल्या बांधिलकीचे दर्शन घडले.

अजगराची सुखरूप सुटका

खांदेश्वर : रात्रीच्या काळोखात नाल्याच्या कडेला असलेल्या झाडावर तब्बल २० ते २५ फूट उंचीवर चढलेल्या अजगराला सुखरूप पकडण्यात सर्पमित्र आणि अग्निशमन दलाला यश आले. मध्यरात्री बाराच्या सुमारास सीबीडी बेलापूर परिसरात घडलेल्या या घटनेमुळे परिसरात काही काळ उत्सुकतेचे वातावरण निर्माण झाले होते. सीबीडी बेलापूर परिसरातील नाल्याच्या कोपऱ्याजवळून जात असताना काही नागरिकांना एक अजगर झाडावर चढताना दिसला. नागरिकांनी



तात्काळ पुनर्वसू फाउंडेशनशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. माहिती मिळताच सर्पमित्र अष्टविनायक मोरे यांनी घटनास्थळी धाव घेतली. पाहणीदरम्यान अजगर झाडावर सुमारे २० ते २५ फूट उंचीवर असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. झाडाखाली खोल नाला असल्याने अजगराला पकडण्याचे काम अत्यंत आव्हानात्मक होते. अजगराचा तोल जाऊन तो खाली पडण्याची शक्यता तसेच बचावकार्यातील संभाव्य धोका लक्षात घेऊन मोरे यांनी अग्निशमन दलाची मदत मागितली. त्यानंतर अग्निशमन दलाचे वाहन आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या मदतीने शिडी लावून बचावकार्य सुरू केले. एका बाजूला उंच झाडावर असलेला अजगर आणि दुसऱ्या बाजूला खोल नाला, अशा प्रतिकूल परिस्थितीत सर्पमित्र अष्टविनायक मोरे यांनी अत्यंत सावधगिरीने अजगराला पकडले. त्यानंतर त्याला नैसर्गिक अधिवासात सुरक्षितपणे मुक्त करण्यात आले.

निवडक



महावितरणमध्ये सन्मान सौदामिनीचा सोहळा

रायगड : महावितरण कंपनीत विविध पदांवर कार्यरत महिला अधिकारी आणि कर्मचारी यांच्या कामाचे कौतुक करण्यासाठी कल्याण परिमंडळात सन्मान सौदामिनीचा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.तेजश्री इमारतीत आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी मुख्य अभियंता रवींद्र आव्हाड उपस्थित होते. यावेळी उपस्थित सर्व महिला अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना पुस्तक आणि गुलाब पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. महावितरण कंपनीत कार्यरत महिला अधिकारी आणि कर्मचारी या पुरूषांच्या बरोबरीने काम करत असल्याने देशातील आघाडीची वीज वितरण कंपनी झाली आहे, असे गौरवोद्गार प्रभारी मुख्य अभियंता रविंद्र आव्हाड यांनी काढले. यावेळी काही महिला कर्मचाऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कोमसापचे सारडे गावी कविसंमेलन उत्साहात



उरण : उरण तालुक्यातील सारडे या गावी कोकण मराठी साहित्य परिषद (कोमसाप)उरण शाखेचे बहारदार कविसंमेलन झाले. भेंडखळ गावच्या उपसरपंच संगीता मेघश्याम भगत या कार्यक्रमाच्या अध्यक्ष होत्या. प्रमुख अतिथी म्हणून साहित्यरत्न रायगडभूषण प्रा. एल बी पाटील, शाखाध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे, के. एस.पाटील, सुनंदा पाटील आदी मान्यवर होती.प्रास्ताविक गंधार पाटील यांनी नवरात्रीमधील दुर्गामातेचे महत्त्व स्पष्ट करून समाजातील आजच्या महिषासुर अधिक घातक आहेत,सांगून आयोजक सारड्याच्या पाटील कुटुंबीयांचे अभिनंदन केले. म.का.म्हात्रे यांच्या सुरेख सूत्रसंचालनात बहारदार कविसंमेलन रंगले.बालकवी अनुज शिवकर, अभ्यासू कवी केशव म्हात्रे, रांगड्या आवाजाचे शाहीर अनंत पाटील, अजय शिवकर, मच्छिंद्र म्हात्रे, साहित्यरत्न रायगडभूषण प्रा. एल. बी. पाटील यांनी आगरी ढंगात कविता सादर करून वातावरण हलकेफुलके केले.जे.एस. पाटील, एम. एस. पाटील, सुनील पाटील, हरिश्चंद्र पाटील आणि पाटील कुटुंबीयांनी अतिशय सुरेख नियोजन केले. सुनील केशव यांनी उपस्थितांचे आभार मानले.

जुगार अड्ड्यावर छापा, ११ जणांवर गुन्हा

पनवेल : पनवेल शहर पोलिसांनी जुगार अड्ड्यावर छापा टाकत ११ जणांविरोधात १९ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल केला. सेक्टर पाच, करंजाडे येथील सुनील भगत यांच्या घरासमोर जुगार अड्डा चालवला जात असल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळाली. त्यानुसार पनवेल शहर पोलिसांच्या पथकाने या ठिकाणी छापा टाकला. पोलिसांनी त्या ठिकाणाहून दोन लाख सात हजार दोनशे रुपये आणि मोबाईल जप्त केले. याप्रकरणी सुनील गोपाळ भगत (जुगार चालक), माळप्पा नारायणकर, विजय रमेश वाघे, विजय गहिनाथ जगताप, सीमंता मुचू गोराई, पप्पू बाळेश्वर पाठक, शशिकांत रघुनाथ भिंगारकर, सूर्यकांत राघव गायकर, विश्वनाथ निवृत्ती चव्हाण, सुरज मोतीराम राणे, विजय मारुती साबळकर यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला.

श्रीवर्धनमध्ये दुर्गामाता दौड उत्साहात



श्रीवर्धन : श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, श्रीवर्धन यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली पारंपारिक मश्री दुर्गामाता दौडफ विजयादशमीच्या (दसरा) मंगल पर्वावर अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाली.घटस्थापना ते विजयादशमी या दहा दिवसांच्या कालावधीत दररोज सकाळी सहा वाजता या दौडीचे आयोजन करण्यात आले होते. भारतामातेच्या रक्षणासाठी कटिबद्ध असणारी शिवशंभू रक्ताची आणि राष्ट्रभक्तांची तरुण पिढी घडवणे, तसेच धर्मरक्षण, राष्ट्रभक्ती, संस्कृती आणि स्वाभिमानाची जाणीव समाजात जागृत करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या उपक्रमाची सुरुवात श्री सोमजाई देवी मंदिर येथून झाली. दहा दिवसांच्या या कालावधीत शहरातील विविध मंदिरांतून श्री दुर्गामाता दौडचे आयोजन करण्यात आले होते तसेच अनेक भागांतून दौड मार्गस्थ झाली.यावेळी तरुण आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.भगवे ध्वज, ढोल-ताशांचा गजर आणि छत्रपती शिवाजी महाराज की जय अशा जयघोषाने संपूर्ण श्रीवर्धन शहर दुमदुमून गेले होते. विजयादशमीच्या दिवशी दौडीची सांगता भक्तिमय वातावरणात झाली. श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानच्या कार्यकर्त्यांनी आणि स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाला दिलेला प्रतिसाद उल्लेखनीय होता.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- चेंढरे येथे सोसायटी/कनव्हेंस डिड झालेल्या नवीन इमारतीमधील तीन २ बीएचके रेडी पझेशन फ्लॅट विकणे आहेत. संपर्क : ८१८०८६१२३४/८१८०८५१२३४ एजंट क्षमस्व.
- अलिबागमधील आर्किटेक्चर आणि इंटिरियर डिझायनिंग ऑफिसकरीता ऑटो कॅड ड्राफ्टसमन हवा आहे. संपर्क : ९७६२७७७९७५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

पनवेल महापालिकेला सुरक्षेचे वावडे?

।। कळंबोलीत हॉकर्स झोनचा जीवघेणा खड्डा ।। पालिकेच्या कामाच्या खड्ड्यात डासांची पैदास

। कळंबोली । प्रतिनिधी ।

पनवेल महानगरपालिका हद्दीत महापालिकेच्या माध्यमातून नवीन हॉकर झोन विकसित करण्याचे काम सुरू आहे. कळंबोली सेक्टर-५, केएल-१ येथेदेखील हॉकर झोनचे काम सुरू असून, या कामादरम्यान ठेकेदाराकडून सुरक्षेच्या उपाययोजनांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. सुमारे १० ते १५ फूट खोल खड्डा खोदण्यात आला असून, त्याच्या भोवती कोणतेही बॅरिकेड्स , सुरक्षा पट्टी किंवा संरक्षक जाळी लावण्यात आलेली नसल्याने अपघाताचा धोका निर्माण झाला आहे.



परिसरातून नागरिकांची रहदारी सुरू असते. तसेच परिसरातील लहान मुले या ठिकाणी खेळत असल्याचे दिसून येते. विशेषतः रात्रीच्या वेळी या परिसरात पुरेसा प्रकाश नसल्याने उघडा खड्डा अधिक धोकादायक ठरत आहे. खेळताना अथवा ये-जा करताना एखादे मूल किंवा नागरिक या खड्ड्यात पडल्यास मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे दुर्घटना घडल्यास त्याची जबाबदारी ठेकेदाराची की महापालिका प्रशासनाची? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी नागरिकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक त्या उपाययोजना करणे ही ठेकेदाराची जबाबदारी असतानाच, महापालिका अधिकाऱ्यांनी कामाची वेळोवेळी पाहणी करून सुरक्षा नियमांचे पालन होत आहे की नाही, याची खातरजमा करणे अपेक्षित आहे. मात्र, या ठिकाणी सुरक्षेच्या उपाययोजनांचा अभाव दिसून येत असल्याने संबंधित विभागाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

दरम्यान, कळंबोलीसह पनवेल महापालिका हद्दीत डेंग्यू आणि मलेरियाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेकडून जनजागृती आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहेत. मात्र, येथील हॉकर झोनच्या कामासाठी खोदलेल्या खड्ड्यात गेल्या अनेक दिवसांपासून मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. या साचलेल्या पाण्यात डासांची उत्पत्ती होण्याची शक्यता असल्याने परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

एका बाजूला डेंग्यू-मलेरियाविरोधात जनजागृती आणि दुसऱ्या बाजूला महापालिकेच्या विकासकामाच्या ठिकाणीच पाणी साचून डासांची उत्पत्ती, अशी विरोधाभासी परिस्थिती निर्माण झाल्याची नागरिकांची नाराजी आहे.

तातडीने कारवाईची मागणी

या प्रकरणाची महापालिका प्रशासनाने तातडीने दखल घेऊन संबंधित ठेकेदाराची चौकशी करावी, सुरक्षा नियमांचे पालन न केल्यास कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. तसेच खड्ड्याभोवती तातडीने बॅरिकेडिंग, संरक्षक जाळी व पुरेशी प्रकाशव्यवस्था करावी आणि साचलेले पाणी काढून खड्डा सुरक्षितपणे बंद करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.महापालिका आयुक्त व महापौर यांनी या गंभीर प्रकाराची पाहणी करून नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे, अशी अपेक्षा कळंबोलीकरांकडून व्यक्त होत आहे.



● श्री. विश्वास थळे, मु. कोळगाव, ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान देवीचे दर्शन घेण्यासाठी उपस्थित सासवणे ग्रामपंचायत सदस्या संजना संदेश पाटील व इतर. (छायाचित्र - अब्दुल सोगावकर)



● श्री. दत्ता म्हात्रे, मु. कोळगाव, ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी सिद्धेश्वरी देवीचे दर्शन घेण्यासाठी उपस्थित सासवणे ग्रामपंचायत सदस्या संजना संदेश पाटील व इतर. (छायाचित्र - अब्दुल सोगावकर)



● श्री. सदानंद म्हात्रे व कुटुंबीय, मु. कोळगाव, ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी कुलदैवत मातेचे दर्शन घेण्यासाठी उपस्थित सासवणे ग्रामपंचायत सदस्या संजना संदेश पाटील व इतर. (छायाचित्र - अब्दुल सोगावकर)



● नवरात्रोत्सवात अलिबाग शहरातील मारुती नाका येथील दुर्गामातेचे दर्शन घेण्यासाठी उपस्थित सासवणे ग्रामपंचायतीच्या सदस्या संजना पाटील, ॲड. मानसीताई म्हात्रे व इतर. (छायाचित्र- अब्दुल सोगावकर)



● श्री. सार्वजनिक बालमित्र मंडळ, दिघोडी-सासवणे, ता. अलिबाग येथील देवीचे दर्शन घेण्यासाठी उपस्थित सासवणे ग्रामपंचायत सदस्या संजना संदेश पाटील व इतर. (छायाचित्र - अब्दुल सोगावकर)



● सार्वजनिक दुर्गामाता नवरात्रोत्सव मंडळ कोळगाव, ता. अलिबाग येथील देवीचे दर्शन घेण्यासाठी उपस्थित सासवणे ग्रामपंचायत सदस्या संजना संदेश पाटील व इतर. (छायाचित्र - अब्दुल सोगावकर)

२२० लीटर डिझेलची चोरी

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल तालुक्यातील तळोजा औद्योगिक वसाहतीमध्ये उभ्या असलेल्या वाहनाच्या डिझेल टँक मधून २२० लिटर डिझेलची चोरी केल्याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात अज्ञात चोराविरोधात १८ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विकी साहू यांनी फोर ट्रेन स्टील कंपनीच्या समोरील रस्त्यावर तळोजा एमआयडीसी येथे वाहन पार्क केले होते. यावेळी अनोळखी इसमाने डिझेलच्या टँकमधून २२० लीटर डिझेलची चोरी करून पोबारा केला आहे.



● भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा अलिबागच्यावतीने अशोक विजयादशमी आणि धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अलिबाग तालुक्यातील महाजने येथील बुद्ध विहारांमध्ये हा सोहळा पार पडला. यावेळी मान्यवर उपस्थित होते.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सत्काराचे कार्यक्रम टाळा

पालकमंत्री भरत गोगावले यांचे आवाहन

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यात संभाव्य दुष्काळी परिस्थितीचे सावट लक्षात घेता, सध्याच्या काळात जाहीर सत्काराचे कार्यक्रम टाळून जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य द्या, असे आवाहन रायगडचे पालकमंत्री तथा राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी कार्यकर्त्यांना केले. संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन नागरिकांनी आतापासूनच पाणी बचतीचे नियोजन करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

पोलादपूर तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मोरगिरी येथील ३० लाख रुपये खर्चाच्या नूतन इमारतीचे उद्घाटन पालकमंत्री गोगावले यांच्याहस्ते करण्यात आले. याच कार्यक्रमात मोरगिरी ग्राम पंचायत कार्यालयाच्या नवीन इमारतीचे भूमिपूजन करण्यात येऊन मोरगिरी गावठाण प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.मंत्री गोगावले यांनी पावसाचे पाणी अडवणे, जमिनीत पाणी मुरवणे आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करून संभाव्य टंचाईचा सामना करण्यासाठी नागरिकांनी आतापासूनच दक्ष राहावे, असेही स्पष्ट केले.

ब्रेझा कारचा अपहार

। पनवेल । प्रतिनिधी ।

ब्रेझा कारचा अपहार केल्याप्रकरणी दत्ता सुरेश क्षीरसागर, रुपेश शेळके आणि प्रेम राणा या तिघांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात १८ ऑक्टोबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ५ ऑक्टोबर रोजी दत्ता क्षीरसागर, रुपेश शेळके आणि प्रेम राणा यांनी संगनमत करून फिर्यादी जयंत अभिमन्यू गायकवाड (राहणार घणसोली) यांच्या मालकीची साडेचार लाख रुपयांची ब्रेझा कार ही वापरासाठी पाहिजे असे सांगून घेवून गेले. ती ब्रेझा कार त्यांना परत न देता कारचा अपहार केला. या प्रकरणाचा पनवेल शहर पोलीस अधिक तपास करत आहेत.

विद्यार्थ्यांकडून मातांचे पाद्यपूजन व औक्षण | **४५० विद्यार्थ्यांसाठी मदतीचा हात**

उत्तेखोल आश्रमशाळेत 'आमच्या दुर्गा माता' पूजन सोहळा

। माणगाव । प्रतिनिधी ।

वनवासी कल्याण आश्रम महाराष्ट्र संचलित कै. सौ. विजया गोपाळ गांधी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, उत्तेखोल येथे नवरात्रोत्सवानिमित्त आमच्या दुर्गा' या संकल्पनेतून माता पूजनाचा भावपूर्ण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

विद्यार्थ्यांमध्ये मातृप्रेम, कृतज्ञता आणि संस्कारांची रुजवणूक करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमात ४७ महिला पालक सहभागी झाल्या. विद्यार्थ्यांनी आपल्या आईचे पाद्यपूजन, औक्षण करून आशीर्वाद घेतले. या भावनिक सोहळ्याने उपस्थितांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले.



या आश्रमशाळेला २६ वर्षे पूर्ण झाली असून वनवासी समाजातील सुमारे ४५० विद्यार्थी येथे निवासी राहून शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्यावर चांगले संस्कार व्हावेत, यासाठी शाळेत विविध उपक्रम राबविले जातात. दरवर्षी नवरात्रोत्सवात कन्यापूजन केले जाते. यंदा प्रथमच विद्यार्थ्यांच्या महिला पालकांचा सन्मान करण्यासाठी माता पूजनाचा उपक्रम राबविण्यात आला.

पाहुण्यांकडून शाळेला भरघोस मदत

या भेटीदरम्यान पाहुण्यांनी शाळेसाठी १६ नवीन पंखे, विद्यार्थ्यांसाठी साबण, तेल व दंतमंजन असलेले ४५० संच, तसेच अकरावीच्या विद्यार्थिनींसाठी पंजाबी ड्रेस भेट दिले. उपस्थितांपैकी १३ कार्यकर्ते हे १९८८ च्या पदवीधर वर्गातील वर्गमित्र असून ते दरवर्षी एकत्र येऊन विविध शाळांना मदत करतात. यंदा त्यांनी उत्तेखोल आश्रमशाळेसाठी मदतीचा हात पुढे केला.

कष्टकरी मातांचा अनोखा सन्मान

वनवासी समाजातील महिला पहाटे पाच वाजल्यापासून रात्री उशिरापर्यंत कष्टाची कामे करतात. कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी अथक परिश्रम घेतानाच आपल्या मुलांच्या उज्वल भविष्यासाठी त्या त्यांना शिक्षणासाठी आश्रमशाळेत पाठवतात. मुलांना शिक्षणाच्या माध्यमातून चांगले भविष्य मिळावे, यासाठी मन कठोर करून त्यांच्यापासून दूर राहणाऱ्या या महिला खऱ्या अर्थाने दुर्गा आहेत, अशी भावना या उपक्रमामागे व्यक्त करण्यात आली.

दरवर्षी हा उपक्रम राबविणार

कार्यक्रमाला प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक अरुण पाटील आणि माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक उत्तम पाटील उपस्थित होते. मनोगत व्यक्त करताना उत्तम पाटील यांनी हा उपक्रम अत्यंत भावनिक आणि संस्कारक्षम असल्याचे सांगितले. यापुढे दरवर्षी शाळेत हा कार्यक्रम अधिक व्यापक स्वरूपात साजरा करण्यात येईल, असे त्यांनी नमूद केले.

कल्हेत १५० वर्षांची 'सोनं लुटण्याची' परंपरा कायम



खांदा कॉलनी : मुंबई-गोवा महामार्गालगत आणि कर्नाळा पक्षी अभयारण्याच्या परिसरात असलेल्या कल्हे गावात विजयादशमी अर्थात दसऱ्यानिमित्त सोनं लुटण्याची सुमारे १५० वर्षांची परंपरा आजही मोठ्या उत्साहात जपली जात आहे. काळ बदलला, सण साजरे करण्याच्या पद्धती बदलल्या; मात्र कल्हे ग्रामस्थांनी आपल्या पूर्वापार चालत आलेल्या या अनोख्या परंपरेची ओळख आजही कायम ठेवली आहे.

दसऱ्याच्या दिवशी गावातील मंदिराच्या वाडीमध्ये ग्रामस्थ एकत्र येतात. यावेळी आपट्याची पाने गोळा करून त्यांना प्रतीकात्मक सोन्याचे स्वरूप दिले जाते. ही पाने एकत्र करून मंदिर परिसरातील ठरलेल्या जागी ठेवली जातात. मंदिरातील पूजा-अर्चा पूर्ण झाल्यानंतर ग्रामस्थ या जागेकडे धाव घेतात आणि आपट्याची पाने एकमेकांना देत पारंपरिक पद्धतीने 'सोनं' लुटतात.

या अनोख्या सोहळ्यात लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वजण उत्साहाने सहभागी होतात. एकमेकांना आपट्याची पाने देताना ग्रामस्थांकडून सोन्यासारख्या समृद्धीच्या, सुखाच्या आणि भरभराटीच्या शुभेच्छा दिल्या जातात. त्यामुळे मंदिराची वाडी आनंद, उत्साह आणि आपुलकीच्या वातावरणाने फुलून जाते.

दसऱ्याच्या दिवशी आपट्याची पाने एकमेकांना देण्यामागे सोने वाटण्याची प्रतीकात्मक भावना आहे. पारंपरिक समजुतीनुसार आपट्याच्या पानांना सोन्याचे प्रतीक मानले जाते. त्यामुळे ही पाने नातेवाईक, मित्रमंडळी आणि गावकऱ्यांना देऊन परस्परांतील स्नेह वृद्धिंगत केला जातो.

पनवेल महानगरपालिका
दरपत्रके मागविण्याबाबत

पनवेल शहरातील एकूण १२ राष्ट्रीय पुरुषांच्या पुतळ्यांना नियमितपणे पुष्पहार घालणे आवश्यकतेनुसार शासकीय परिपत्रकानुसार जयंतीस पुष्पहार व पमपा मार्फत साजरा होणारे विविध कार्यक्रमाकरता पुष्पतोरण, पुष्पमाळ नमुन्याप्रमाणे पुरविणेबाबतचा दरकरार करणेकामी तयार करण्याकरीता जाहिर ई-निविदा मागविण्यात येत आहेत. या कामासंबंधीचा सविस्तर तपशील www.mahatender.gov.in या वेबसाईटवर व भांडार विभागात उपलब्ध आहे.

जा.क्र.: पमपा/भांडार/२९२६/९१५/२०२६
दिनांक : १६/१०/२०२६

स्वाक्षरी /-
(गणेश शेटे)
अतिरिक्त आयुक्त
पनवेल महानगरपालिका

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या शेतजमीन मिळकती तिचे मालक १) श्री.काशीनाथ मारुती राऊत २) सौ. सुरेखा काशिनाथ राऊत यांजकडून कायमच्या खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्रफळ (हे. आर)	आकार (रू. पै.)
३०	२ / अ	३-९१-२०	१=२०
३०	२ / ब	०-८०-००	०=६०
३०	२ / क	०-८०-००	०=६०

वर वर्णन केलेल्या मिळकतींबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त चार्ज लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतींच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक २०/१०/२०२६

ॲड. महेश मोतीराम घारे
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४/९२७१८६९२०२

जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री.वैभव चंद्रकांत कडव, श्री.गणेश दिलीप देवघरे यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

शेतजमिन मिळकतीचे वर्णन
मौजे मार्केवाडी, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत

वरील शेतजमीन मिळकत सर्व्हे नं २९/२/ब एकुण ०.८५.२० गुंठे क्षेत्र पैकी लिहुन देणार यांचे हिश्याचे क्षेत्र ०.२०.०० गुंठे क्षेत्र विकत घेणार आहेत. तरी शेतजमिन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : २१/१०/२०२६

ॲड देविदास यशवंत देवघरे
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. हरिशंकर केदारनाथ ठाकूर यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

जमिन मिळकतीचे वर्णन
मौजे वारे, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं १४४/१०/ब यांचे एकुण क्षेत्र ०.९१.०० गुंठे, तसेच सर्व्हे नं १४४/८/अ/१ यांचे एकुण क्षेत्र १.८३.०० गुंठे, मिळकत विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : २१/१०/२०२६

ॲड देविदास यशवंत देवघरे
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक सौ.मिना संजीवकुमार मन्ढोलिया, श्री.संजीवकुमार मोहनलाल मन्ढोलिया यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

जमिन मिळकतीचे वर्णन
मौजे वारे, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं १४१/३/अ यांचे एकुण क्षेत्र २.६८.०० गुंठे, तसेच सर्व्हे नं १४३/२/ब यांचे एकुण क्षेत्र १.०१.०० गुंठे, मिळकत विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : २१/१०/२०२६

ॲड देविदास यशवंत देवघरे
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक १. श्री.पराग अशोक हिरे व २. श्री. मनोज विश्वनाथ खैरनार यांचे कडून विकत घेण्याचे ठरवीले आहे.

मौजे. अत्रांट तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड येथिल मिळकत

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे. आर.)	आकार (रू.पै.)
२८	२०	०-९०-००	०-७५

यापैकी १.श्री.पराग अशोक हिरे व २. श्री. मनोज विश्वनाथ खैरनार यांचे मालकीची व हिश्याची ०-३५-०० हे. आर. क्षेत्राची मिळकत

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि. २१/१०/२०२६.

ॲड. नरेश रामदास आहीर.
पत्ता - शॉप नं. १२, शिवगंगा अपार्टमेंन्ट,
ब्राम्हणआळी, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड- ४१०१०१.
मो. - ९३२५०६००३७/९०११२९२९८७.

जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री.अविनाश तुळशिराम पाटील, सौ.पदमा सुरेश पाटील यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

जमिन मिळकतीचे वर्णन
मौजे वारे, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं १४३/१ यांचे एकुण क्षेत्र १.८१.०० गुंठे, मिळकत विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपटटा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : २१/१०/२०२६

ॲड देविदास यशवंत देवघरे
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री.रामदास सखाराम म्हसे यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

जमिन मिळकतीचे वर्णन
मौजे पोही, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं १८/५ एकुण ०.२९.०० पोट खराबा ०.००.०० गुंठे असे एकुण क्षेत्र ०.२९.०० जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : २१/१०/२०२६

ॲड देविदास यशवंत देवघरे
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत सौ.लता विलास माळी, रा. खांडस, ता.कर्जत, जि.रायगड यांचेकडुन कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे खांडस, तालुका कर्जत, जिल्हा रायगड

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार (रू.पैसे)
८१	३	१-२२-००	१=१२

पैकी लिहुन देणार यांचे हिश्याचे विक्री केलेले क्षेत्र २५ गुंठे

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजुन वरील मिळकतींचा व्यवहार पुर्ण केला जाईल मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि. २०/१०/२०२६

ॲड.कैलास गणपत मोरे
बी.एल.एस, एलएल.बी
प्रभात अपार्टमेंट रूम नं.४ दुसरा मजला
सुनिल चिक्कीजवळ ता.कर्जत जि.रायगड
मो.नं.९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीद्वारे असे कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी मौजे बेकरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खाली नमूद केलेल्या सर्वे नं ६९/६ या शेतजमिनीपैकी खाते क्र.२०३ मधील श्री.चंद्रहास शंकर गावंड यांचा मालकीहक्काची जमीन कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याची ठरविलेली असून, सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मौजे बेकरे, तालुका कर्जत, जिल्हा रायगड, येथील मिळकतीचे वर्णन

सर्वे नं	हिस्सा नं	क्षेत्र हे.आर.प्र	आकार
६९	६	एकुण १.५५.०० पैकी श्री.चंद्रहास शंकर गावंड यांचे मालकीचे विकत घेण्याचे ठरलेले क्षेत्र ०.२०.००	०.०९

तरी वरील मिळकतीवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध साठेकारार, बयाणापावती, गहाणखत, दान, बक्षीस, भाडेपट्टा, बोजा, जप्ती, कुळवहिवाट, इजमेंट, मृत्यूपत्रांकित, चार्ज लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास संबंधीतांनी हि नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्या पत्त्यावर सकृतदर्शनी पुराव्यासह आपली लेखी हरकत रजिस्टर पोस्टाने पाठवण्यात यावी, याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचाही कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध नाहीत असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करून आम्ही सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करू. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आम्ही जबाबदार राहणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटिस दिली.

सही/-

ठिकाण-कर्जत
तारीख : २१.१०.२०२६

अधिवक्ता अविष्कार अरुण अभंगे
मो नं ८०८७३४९०१८
पत्ता- नेमीनाथ हाईट, मुद्रे बुद्रुक, कर्जत रायगड ४१०२०१

जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री.बाळु बारकु भोईर यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

जमिन मिळकतीचे वर्णन
मौजे बोरीवली, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ६७/३ एकुण ०.१५.३०. पोट खराबा ०.०१.८० गुंठे असे एकुण क्षेत्र ०.१७.१० जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : २१/१०/२०२६

ॲड देविदास यशवंत देवघरे
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी मौजे-चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची निवासी सदनिका मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील चेंढरे ग्रामपंचायत हद्दीतील सर्व्हे नं.१२०, हिस्सा नं. ३ब+२ड, प्लॉट नं. ७,९,१० या मिळकतीवर बांधलेल्या शिवशक्ती को. ऑप. हौ. सोसायटी लि. या इमारती मधील बी विंग, २ रा मजल्यावरील निवासी सदनिका क्र.११, एकुण क्षेत्र ५९४.९० चौ. फुट (बिल्टअप) हि मिळकत

सदर नोटीसीचा विषय असलेली बांधकाम मिळकत हि विद्यमान मालक श्री.सुनिल हरिभाऊ माळी यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या निवासी सदनिका मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची निवासी सदनिका मिळकत हि विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण - अलिबाग
दिनांक : २०/१०/२०२६
मोबा.नं. ९९२२७०७०१२

ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे
ऑफिस लक्ष्मी नारायण, पहिला मजला,
गाळा नं.७ व ८, ब्राम्हण आळी, राममंदिर
समोर, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१

जाहीर नोटिस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीद्वारे असे कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी मौजे बेकरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खाली नमूद केलेल्या सर्वे नं ६९/४ या शेतजमिनीपैकी खाते क्र.३१२ मधील श्री. प्रितेश रमेश बरे, यांचे मालकीहक्काची जमीन कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याची ठरविलेली असून, सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मौजे बेकरे, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील मिळकतीचे वर्णन.

सर्वे नं	हिस्सा नं	क्षेत्र हे.आर.प्र	आकार
६९	४	एकुण ०.७३.०० पैकी श्री. प्रितेश रमेश बरे यांचे मालकीचे विकत घेण्याचे ठरलेले क्षेत्र ०.२०.००	०.१४

तरी वरील मिळकतीवर इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध साठेकारार, बयाणापावती, गहाणखत, दान, बक्षीस, भाडेपट्टा, बोजा, जप्ती, कुळवहिवाट, इजमेंट, मृत्यूपत्रांकित, चार्ज लिन, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास संबंधीतांनी हि नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्या पत्त्यावर सकृतदर्शनी पुराव्यासह आपली लेखी हरकत रजिस्टर पोस्टाने पाठवण्यात यावी, याप्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचाही कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध नाहीत असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करून आम्ही सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करू. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आम्ही जबाबदार राहणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर नोटिस दिली.

ठिकाण-कर्जत
तारीख २१.१०.२०२६

सही/-
अधिवक्ता अविष्कार अरुण अभंगे
मो नं ८०८७३४९०१८
पत्ता- नेमीनाथ हाईट, मुद्रे बुद्रुक, कर्जत रायगड ४१०२०१

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

सिडको
शहरांचे शिल्पकार

जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे वाटपपत्र/करारनामा प्रस्तावित आहे.

अ. क्र.	नोड व संचिका क्र.	गाव व निवाडा क्र.	सर्व्हे क्र.	संपादित क्षेत्र	मंजूर पात्रता	करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती	वाटपाशी /करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती	संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती
				ता. पनवेल, जि. रायगड				
१	तळोजा २२७	पेंधर १/२००८	१३/४	०-४४-०	४०० चौ.मी.	भूखंड क्र. ३७D, सेक्टर-१६, क्षेत्र-४०० चौ.मी.	कै. सिताराम सखाराम भोईर (मयत) यांचे वारस १. श्रीमती लक्ष्मीबाई सिताराम भोईर २. श्री. नंदकुमार सिताराम भोईर ३. श्री. सतिष सिताराम भोईर ४. श्री. जिवन सिताराम भोईर ५. श्री. अच्युत सिताराम भोईर ६. सौ. प्रेमा चांगदेव पाटील ७. सौ. ज्योती नंदकुमार गायकवाड	--
			एकूण क्षेत्र	०-४४-०				
				नोड- जे.एन.पी.टी. द्रोणागिरी				
२	JNPT ६१	जसखार ३९८/३७४	२४६/१० २२२/२ २२५/१ २३०/२ २३६/८ २४३/२ २५८/५ २६९/५ २७०/९ २६०/४	०-०५-६ ०-१२-२ ०-०९-१ ०-०६-० ०-१०-१ ०-०८-६ ०-१४-७ ०-३७-३ ०-००-८ ०-१२-०	२०३७ चौ.मी.	नोड जे.एन.पी.टी. सेक्टर-०२, भुखंड क्र. १५, क्षेत्र- २०३७ चौ.मी.	**श्री. दत्तात्रेय बाळकृष्ण पाटील (मूळ निवाडाधारक)** **कै. मोतीराम बाळकृष्ण पाटील (मयत) यांचे वारस (वारस दाखला क्र.१९/२०१८)** १. श्री. शेखर मोतीराम पाटील **कै. पांडूरंग बाळकृष्ण पाटील (मयत) यांचे वारस (वारस दाखला क्र.१९/२०१८)** १. श्री. दत्तात्रेय बाळकृष्ण पाटील २. श्री. शेखर मोतीराम पाटील ३. श्री. चंद्रकांत काशिनाथ ठाकुर ४. श्री. हरिश्चंद्र काशिनाथ ठाकुर ५. श्री. महेंद्र काशिनाथ ठाकुर ६. श्रीमती सरिता अविनाश ठाकूर ७. श्री. मिलिंद अविनाश ठाकूर ८. कै. अनुसया सुधाकर उर्फ सुदाम ठाकूर (मयत) **कै. अनुसया सुधाकर उर्फ सुदाम ठाकूर (मयत) यांचे वारस (वारस दाखला क्र.१११/२०२४)** १. श्री. जयदास सुधाकर उर्फ सुदाम ठाकूर २. श्री. किशोर सुधाकर उर्फ सुदाम ठाकूर ३. श्री. विरेंद्र सुधाकर उर्फ सुदाम ठाकूर **कै. बयोबाई काशिनाथ ठाकूर (मयत) यांचे वारस (वारस दाखला क्र.१९/२०१८)** १. श्री. चंद्रकांत काशिनाथ ठाकुर २. श्री. हरिश्चंद्र काशिनाथ ठाकुर ३. श्री. महेंद्र काशिनाथ ठाकुर ४. कै. अविनाश काशिनाथ ठाकूर (मयत) यांचे वारसः ४.१ श्रीमती सरिता अविनाश ठाकुर ४.२ श्री. मिलिंद अविनाश ठाकूर **कै. दत्तात्रेय उर्फ दत्ता हाशा घरत (मयत) यांचे वारस (वारस दाखला क्र.१०७/२०२४)** १. श्री. परशुराम दत्तात्रेय घरत २. श्रीमती आनंदी दत्तात्रेय घरत ३. श्री. ज्ञानेश्वर दत्तात्रेय घरत ४. श्रीमती वासंती धनाजी कडू ५. श्रीमती शारदा रमेश पाटील ६. श्रीमती लता प्रमोद पाटील **कै. नरशा उर्फ नरेश उर्फ नरसु सुका ठाकूर (मयत) यांचे वारस (वारस दाखला क्र.१५८/२०१७)** १. श्री. प्रविण नरशा उर्फ नरेश उर्फ नरसु सुका ठाकुर २. श्री. साईनाथ नरशा उर्फ नरेश उर्फ नरसु सुका ठाकुर ३. श्रीमती चंद्रभागा नरशा उर्फ नरेश उर्फ नरसु सुका ठाकुर ४. श्रीमती वैशाली प्रणाल पाटील ५. श्रीमती वंदना कुमार शेंडगे **कै. प्रविण नरशा उर्फ नरेश उर्फ नरसु सुका ठाकुर (मयत) यांचे वारस (वारस दाखला क्र.१७१/२०२१)** १. श्रीमती पुष्पा प्रविण ठाकुर २. कु. रतिका प्रविण ठाकुर ३. कु. श्रीया प्रविण ठाकुर ४. श्रीमती दिपिका प्रविण ठाकुर उर्फ दिपिका ज्ञानेश्वर ढाकणे	सक्षम न्यायालयाने घोषित केलेले वारस आणि हक्कसोडपत्रानंतर पात्र भूधारक हक्कसोडपत्रानंतर पात्र भूधारक **१. श्री. परशुराम दत्तात्रेय घरत** **२. श्री. साईनाथ नरेश उर्फ नरेश उर्फ नरसु सुका ठाकुर** **३. श्री. शेखर मोतीराम पाटील** **४. श्री. दत्तात्रेय बाळकृष्ण पाटील** यांच्या नावे भूखंड वाटपाचे प्रस्तावित आहे. **नोंदणीकृत हक्कसोडपत्रांची माहिती (सह. दुय्यम निबंधक, उरण):** अ) उरण-२१७५-२०२४, पावती क्र. २९८६, दि. ३१.०५.२०२४: श्रीमती आनंद, श्री. ज्ञानेश्वर, श्रीमती लता (प्रमोद पाटील), श्रीमती शारदा (रमेश पाटील), श्रीमती वासंती (धनाजी कडू) (सर्व दत्ताराम उर्फ दत्तात्रेय घरत) यांनी श्री. परशुराम दत्ताराम उर्फ दत्तात्रेय घरत यांच्या नावे हक्क सोडला आहे. ब) उरण-११८०-२०२४, पावती क्र. १५७१, दि. २१.०३.२०२४: श्रीमती वंदना (कुमार शेंडगे), श्रीमती चंद्रभागा (व्ही. तांडेल), श्रीमती वैशाली (प्रणाल पाटील) व कै. प्रविण नरशा उर्फ नरसु उर्फ नरेश ठाकुर (मयत) तर्फे वारस श्रीमती पुष्पा प्रविण ठाकुर, कु. श्रेया प्रविण ठाकुर, कु. रतिका प्रविण ठाकुर, श्रीमती दिपीका प्रविण ठाकुर उर्फ सौ. दिपिका ज्ञानेश्वर ढाकणे यांनी श्री. साईनाथ नरशा उर्फ नरेश उर्फ नरसु सुका ठाकुर यांच्या नावे हक्क सोडला आहे. क) उरण-६८४५-२०२५, पावती क्र. ८६९८, दि. ३०.१२.२०२५: सर्वश्री महेंद्र काशिनाथ ठाकुर, चंद्रकांत काशिनाथ ठाकुर, हरिश्चंद्र काशिनाथ ठाकुर, श्रीमती सरिता अविनाश ठाकूर, श्री. मिलिंद अविनाश ठाकूर, जयदास सुधाकर ठाकूर, किशोर सुधाकर ठाकूर, विरेंद्र सुधाकर ठाकूर यांनी श्री. दत्तात्रेय उर्फ दत्ता बाळकृष्ण पाटील यांच्या नावे हक्क सोडला आहे. **सदर प्रकरणी श्री. शेखर मोतीराम पाटील यांनी कोणत्याही प्रकारचे हक्क सोडलेले नाहीत.**
		सावरखार १४५	११९/११ १६१/५	०-०८-१ ०-१०-०				
		सावरखार १६८	१५८F/५ १५८D/३	०-८२-१ १-०१-९				
		एकुण संपादित क्षेत्र		**३-१८-५**				

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा / हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, १२.५ टक्के भूमी विभाग, सिडको भवन, तळ मजळा, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी
सिडको/जनसंपर्क/२६०/२०२६-२७

निवडक

शेफाली वर्मावर आयसीसीची कारवाई

जपान : भारतीय अष्टपैलू खेळाडू शेफाली वर्मावर आयसीसीने आचारसंहिता भंग केल्याबद्दल कारवाई केली आहे. तिला फटकारण्यात आले असून एक डिमेरिट पॉइंट देण्यात आला आहे.ही घटना १८ ऑक्टोबर रोजी रायपूर येथे भारत आणि झिम्बाब्वे यांच्यात झालेल्या दुसऱ्या टी-२० सामन्यातील आहे. झेल सुटल्यानंतर शेफालीने रागाच्या भरात चेंडू जमिनीवर फेकला होता.या सामन्यात शेफाली भारताकडून सर्वाधिक धावा करणारी खेळाडू ठरली. तिची सामनावीर



म्हणूनही निवड करण्यात आली. शेफालीने खेळाडू आणि खेळाडू सहाय्यक कर्मचाऱ्यांसाठीच्या आचारसंहितेतील कलम २.२ चे उल्लंघन केले. हा नियम आंतरराष्ट्रीय सामन्यादरम्यान क्रिकेटची उपकरणे, कपडे, मैदानावरील उपकरणे किंवा फिक्स्चरचा चुकीचा वापर करण्याशी संबंधित आहे.दुसऱ्या टी-२० सामन्याच्या पहिल्या डावातील १२व्या षटकात श्री चरणीच्या चेंडूवर मिड-ऑफला चिपो मुगेरी-तिरिपानोचा झेल सुटल्यानंतर शेफालीने चेंडू जमिनीवर फेकला होता. शेफालीने आपली चूक मान्य केली. इंटरनॅशनल पॅनेल ऑफ मॅच रेफ्रीजच्या लक्ष्मी यांनी प्रस्तावित केलेली शिक्षाही तिने स्वीकारली. भारत आणि झिम्बाब्वे यांच्यातील तिसरा टी-२० सामना आज खेळवला जाणार आहे. हा सामना रायपूरच्या शहीद वीर नारायण सिंह आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर होणार आहे. या सामन्यात शेफालीकडे इतिहास रचण्याची संधी आहे. तिने ७८ किंवा त्याहून अधिक धावा केल्या, तर महिला टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एका कॅलेंडर वर्षात १,००० धावा करणारी ती जगातील पहिली खेळाडू ठरेल.

प्रज्ञान ओझा नवीन मुख्य निवडकर्ता

नवी दिल्ली : बीसीसीआयने अखेर आपल्या नवीन मुख्य निवडकर्त्याची निवड केली आहे. अजित आगरकर यांच्यानंतर प्रज्ञान ओझा यांची नवीन मुख्य निवडकर्ता म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सुरुवातीला ओझा यांची अंतरिम अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. परंतु आता या माजी क्रिकेटपटूची पूर्णवेळ मुख्य निवडकर्ता म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. माजी क्रिकेटपटू वसीम जाफर,



रमेश पोवार, कॉनर विल्यम्स आणि जेकब मार्टिन यांनीही टीम इंडियाचे मुख्य निवडकर्ता होण्यासाठी अर्ज केला होता. परंतु कोणाचीही निवड झाली नाही. बीसीसीआयने प्रज्ञान ओझा यांची निवड करणे आवश्यक मानले. बीसीसीआयने सोमवारी ही अधिकृत घोषणा केली आहे. रमेश पोवार यांचाही निवड समितीत समावेश करण्यात आल्याचे म्हटले आहे. मंडळाने एका निवेदनात म्हटले आहे की, क्रिकेट सल्लागार समितीने पुरुष निवड समितीच्या सदस्याच्या नियुक्तीसाठी निवड प्रक्रिया पूर्ण केली आहे. बीसीसीआयच्या मुख्यालयात अर्जदारांची छाननी आणि मुलाखती घेण्यात आल्या. ज्यानंतर त्यांनी एकमताने पोवार यांच्या नियुक्तीची शिफारस केली.प्रज्ञान ओझा आता टीम इंडियाच्या नवीन निवड समितीचे अध्यक्ष असतील. त्यांच्यासोबत शिव सुंदर दास, आरपी सिंग, अजय रात्रा आणि रमेश पवार हे देखील निवड समितीचे नवीन सदस्य असतील.

'मायटी मराठाज' ठरले विजेते



मुंबई : मायटी मराठाज संघाने आर्चरी प्रीमियर लीगच्या दुसऱ्या हंगामाचे विजेतेपद पटकावले. अंतिम सामन्यात त्यांनी काकतीय नाइट्सचा ६-२ असा एकतर्फी पराभव केला. विशेष बाब म्हणजे मराठाजला याच दिवशी झालेल्या पहिल्या क्वालिफायर सामन्यात नाइट्सकडून पराभव पत्करावा लागला होता, परंतु अंतिम सामन्यात त्यांनी जोरदार पुनरागमन करत विजय मिळवला. संघाचा रिकर्व्ह स्टार धिरज बोम्मादेवरा याने या विजयात मोलाची भूमिका बजावली; त्याने अंतिम निशाणा थेट इनर एक्स-रिंग मध्ये मारून विजयावर शिक्कामोर्तब केले.अंतिम सामन्यात धिरजने ८० पैकी ७९ गुण मिळवून उत्कृष्ट कामगिरी केली, तर मिस्टर परफेक्ट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माईक श्लोसरने आपल्या टोपणनावाला साजेसा खेळ करत ८० पैकी ८० गुण मिळवले. काकतीय नाइट्स संघ अंतिम सामन्यात आत्मविश्वासाने उतरला होता, कारण त्यांनी शनिवारी लीगच्या शेवटच्या सामन्यात आणि त्यानंतर पहिल्या क्वालिफायरमध्येही मराठाजचा पराभव केला होता. मात्र, मराठाजने जिद्द न सोडता दुसऱ्या एलिमिनेटर सामन्यात पृथ्वीराज योद्धाजचा पराभव करून अंतिम फेरीत धडक मारली.या स्पर्धेत धिरजला सर्वोत्तम पुरुष रिकर्व्ह आर्चरी खेळाडू म्हणूनही गौरविण्यात आले.

एशियन पॅरा गेम्समध्ये भारताचा डंका

।। दीप्ती जीवनजीने पटकावले सुवर्णपदक ।। ४०० मीटरच्या टी २० मध्ये सेट केला नवा रेकॉर्ड

। जपान। वृत्तसंस्था ।

आशियाई पॅरा गेम्स २०२६ मध्ये भारतीय खेळाडू आपली प्रभावी कामगिरी कायम ठेवत आहेत. २० ऑक्टोबर रोजी, दीप्ती जीवनजीने ॲथलेटिक्समध्ये एक उल्लेखनीय कामगिरी केली, तिने केवळ सुवर्णपदकच जिंकले नाही, तर एक नवीन क्रीडा विक्रमही प्रस्थापित केला.

तिने महिलांच्या ४०० मीटर टी-२० प्रकारात ५६.३६ सेकंदांची वेळ नोंदवून प्रथम क्रमांक पटकावला. हे या स्पर्धेतील भारताचे पाचवे सुवर्णपदक असून, दुसऱ्या दिवशीचे देशाचे हे पहिले सुवर्णपदक आहे.

पॅरिस पॅरालिम्पिक्स २०२४ ची कांस्यपदक विजेती दीप्तीने शर्यतीच्या सुरुवातीपासूनच



भारतीय तिरंदाजीपटूंची उत्कृष्ट कामगिरी

आशियाई पॅरा गेम्समधील तिरंदाजीच्या स्पर्धांमध्येही भारतीय खेळाडूंनी चांगली कामगिरी केली. हरविंदर सिंग आणि भावना यांनी रिकर्व्ह प्रकारात उपांत्यपूर्व फेरी गाठली. दरम्यान, शीतल देवी, पायल नाग, तोमन कुमार आणि श्याम सुंदर स्वामी यांनीही कंपाऊंड प्रकारात अंतिम आठमध्ये स्थान मिळवले.

जोरदार कामगिरी केली.

तिने आपली सर्वात जवळची प्रतिस्पर्धी, जपानची नीना कानो हिला दोन सेकंदांपेक्षा जास्त फरकाने मागे टाकले. कानोने ५८.९२ सेकंदांच्या वेळेसह रौप्यपदक जिंकले, तर जपानच्या अकाने काटोने १ मिनिट ०.२६ सेकंदांच्या वेळेसह कांस्यपदक पटकावले. दीप्तीच्या या कामगिरीमुळे भारतीय पथकाला नवी ऊर्जा मिळाली आहे. तिच्या कामगिरीतून हे देखील दिसून येते की भारतीय पॅरा-ॲथलीट आंतरराष्ट्रीय स्तरावर सातत्याने आपली छाप पाडत आहेत.

भावना पटेलने कांस्य पदक जिंकले

भारताची अनुभवी पॅरा-टेबल टेनिसपटू भावना पटेलने महिला एकेरीच्या वर्ग ४-५ प्रकारात कांस्य पदक जिंकले. उपांत्य फेरीत तिला चीनच्या झांग बियानकडून ०-३ असा पराभव पत्करावा लागला. झांगने हा सामना ११-७, ११-५, ११-७ असा जिंकला. २०२० टोकियो पॅरालिम्पिकमध्ये रौप्य पदक जिंकणारी भावना या पराभवामुळे एकेरी स्पर्धेतून बाहेर पडली. मात्र, उपांत्य फेरी गाठून तिने भारताच्या पदकतालिकेत कांस्य पदकाची भर घातली.

पॅरा-बॅडमिंटनमध्येही पदकाच्या आशा कायम

पॅरा-बॅडमिंटनमध्ये, प्रमोद भगत आणि मनीषा रामदास या भारतीय मिश्र जोडीने उपांत्य फेरी गाठून पदक मिळवले. एसएल३-एसयू५ उपांत्यपूर्व फेरीत, या भारतीय जोडीने थायलंडच्या चनिदा श्रीनवाकुल आणि सिरीपोंग टीमारोम यांचा २१-१५, २१-१४ अशा सरळ गेममध्ये पराभव केला. सामना केवळ २५ मिनिटे चालला. उपांत्य फेरी गाठल्यामुळे भारतीय जोडीचे किमान कांस्यपदक निश्चित झाले आहे. आता, ते स्पर्धेत आणखी पुढे जाऊन आपल्या पदकाचा रंग बदलण्याचा प्रयत्न करतील.

उरणच्या तीन खेळाडूंची राष्ट्रीय बँडी स्पर्धेत सुवर्णभरारी!

वरदा असारकर, सात्विक बाजी आणि शिवांश तांडेल यांना सुवर्णपदक

। उरण । प्रतिनिधी ।

आठव्या राष्ट्रीय बँडी अजिंक्यपद स्पर्धा २०२६ मध्ये रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील तीन युवा खेळाडूंनी सुवर्णपदक पटकावत घवघवीत यश संपादन केले आहे. वरदा केदार असारकर, सात्विक बाजी आणि शिवांश तांडेल या तिन्ही खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर सुवर्णपदक मिळवून उरणच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

या स्पर्धेत वरदा असारकर हिने १२ वर्षांखालील मुलींच्या गटातून सहभाग घेत सुवर्णपदक पटकावले. तर सात्विक बाजी आणि शिवांश तांडेल यांनी १२ वर्षांखालील मुलांच्या गटातून खेळताना सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. तिन्ही खेळाडूंनी



राष्ट्रीय स्तरावर मिळवलेले हे यश उरणसह संपूर्ण रायगड जिल्ह्यासाठी अभिमानास्पद आहे.

या खेळाडूंच्या यशामागे त्यांची मेहनत, जिद्द, चिकाटी आणि नियमित सराव यांचा मोठा वाटा आहे. त्यांना प्रशिक्षक प्रीती पाटील आणि राकेश पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली या खेळाडूंनी आपल्या कौशल्याची छाप पाडत सुवर्णपदकांची कमाई केली.

तीनही खेळाडूंच्या या उल्लेखनीय यशाबद्दल त्यांचे प्रशिक्षक, पालक, कुटुंबीय आणि क्रीडाप्रेमींकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या कामगिरीमुळे उरणमधील इतर युवा खेळाडूंनाही क्रीडा क्षेत्रात पुढे जाण्याची प्रेरणा मिळणार आहे.

उरणच्या तीन युवा खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक पटकावून उरण आणि रायगड जिल्ह्याचा गौरव वाढवला आहे. त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा दिल्या जात आहेत. अनेक जणांनी त्यांना प्रत्यक्ष भेटून तर अनेकांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या आहेत.

टीम इंडियाचे न्यूझीलंडमध्ये लँडिंग

। क्राइस्टचर्च । वृत्तसंस्था ।



भारतीय क्रिकेट संघ न्यूझीलंडमधील क्राइस्टचर्च येथे दाखल झाला आहे. न्यूझीलंड क्रिकेटने सोशल मीडियावर क्राइस्टचर्च विमानतळावर दाखल झालेल्या भारतीय खेळाडूंचे फोटो शेअर केले आहेत. या फोटोंमध्ये युवा खेळाडू वैभव सूर्यवंशी आणि संघाचे इतर सदस्य त्यांच्या सामानासोबत दिसत आहेत. भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पाच सामन्यांची टी-२० आंतरराष्ट्रीय मालिका २२ ऑक्टोबरपासून सुरू होत आहे. त्यानंतर दोन्ही संघ पाच एकदिवसीय आणि दोन कसोटी सामने खेळतील. वरिष्ठ संघाच्या कसोटी मालिकेपूर्वी, इंडिया अ संघ न्यूझीलंड अ संघाविरुद्ध तीन अनधिकृत कसोटी सामने खेळणार आहे.

भारतीय संघाच्या आगमनापूर्वीच, या मालिकेची न्यूझीलंडमध्ये जोरदार चर्चा सुरू झाली आहे. न्यूझीलंड क्रिकेटच्या माहितीनुसार, भारताच्या दौऱ्यासाठी आतापर्यंत १,१०,००० हून अधिक तिकिटे विकली गेली आहेत. यापैकी ६३,००० तिकिटे केवळ पाच सामन्यांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेसाठी आहेत.

क्राइस्टचर्चमधील हॅगली ओव्हल येथील दोन्ही टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांची आणि हॅमिल्टनमधील सेडन पार्क येथील सामन्याची तिकिटे पूर्णपणे विकली गेली आहेत. दरम्यान, ऑकलंडमधील ईडन पार्क येथे ३० ऑक्टोबर रोजी होणाऱ्या चौथ्या टी २० आंतरराष्ट्रीय सामन्याच्या तिकिटांची मागणी वाढत आहे.

साई किशोरच्या हॅट्ट्रिकमुळे तमिळनाडूचा विजय

। तमिळनाडू । वृत्तसंस्था ।

रणजी करंडकच्या दुसऱ्या फेरीत तामिळनाडूने उत्तराखंडचा डाव आणि ६६ धावांनी पराभव केला. डावखुरा फिरकीपटू साई किशोरने दुसऱ्या डावात हॅट्ट्रिकसह ६ बळी घेतले. अजित रामनेही ४ बळी मिळवले. उत्तराखंडने पहिल्या डावात १३४ धावा केल्या होत्या. तामिळनाडूने ३१३ धावा करून १७९ धावांची आघाडी मिळवली. दुसऱ्या डावात उत्तराखंडचा संघ ११३ धावांवर सर्वबाद झाला. त्यांचे शेवटचे ५ बळी केवळ १० धावांत बाद झाले.

साई किशोरने उत्तराखंडच्या



दुसऱ्या डावातील ४३व्या षटकात हॅट्ट्रिक घेतली. त्याने चौथ्या चेंडूवर लक्ष्य रायचंदानीला बाद केले.यानंतर पाचव्या चेंडूवर सौरभ रावत आणि सहाव्या चेंडूवर आदित्य रावत बाद झाले.

अफगाणिस्तान तिरंगी मालिकेच्या फायनलमध्ये

। दुबई । वृत्तसंस्था ।

यूएईमध्ये सुरू असलेल्या तिरंगी मालिकेतील दुसऱ्या सामन्यात अफगाणिस्तानने झिम्बाब्वेला १५८ धावांनी पराभूत केले. यासोबतच संघाने स्पर्धेच्या अंतिम सामन्यात प्रवेश केला आहे. अंतिम सामना शुक्रवार, २३ ऑक्टोबर रोजी अबू धाबीच्या शेख झायेद स्टेडियमवर खेळवला जाईल.याच मैदानावर सोमवारी रात्री अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत २९४ धावा केल्या. प्रत्युत्तरात झिम्बाब्वेचा संघ ३८.४ षटकांत १३६ धावांवर सर्वबाद झाला.

शिवनेरी कबड्डी महोत्सवात मुंबई पोस्टलची बाजी

। मुंबई । प्रतिनिधी ।

शिवनेरी कबड्डी महोत्सवाच्या व्यावसायिक गटाच्या अंतिम सामन्यात मुंबई पोस्टल संघाने वेस्टर्न रेल्वेचा ३०-२७ असा पराभव करत तीन गुणांनी विजेतेपद पटकावले.

कुमार गटाच्या अंतिम सामन्यात गुड मॉर्निंग स्पोर्ट्स क्लबने विजय क्लबवर सहा गुणांनी मात करत विजेतेपद मिळवले. विजेत्या संघाकडून निलेश मोरे याने चढाईत, तर आदित्य धुमाळ याने पकडीमध्ये प्रभावी कामगिरी केली. विजय क्लबकडून दिलीप गुप्ता आणि विजेंद्र यादव यांनी विजयासाठी प्रयत्न केले. मात्र, गुड मॉर्निंग स्पोर्ट्स क्लबने सरस खेळाच्या जोरावर जेतेपद पटकावले.



■ गुड मॉर्निंग, विवेक महिला संघही विजेते

महिला गटाच्या अंतिम सामन्यात विवेक महिला संघाने शिवशक्ती महिला संघाचा २८-२४ असा पराभव करत चार गुणांनी विजय मिळवला. विवेक संघाकडून तनू हिने चढाईत, तर हरजीत कौर हिने पकडीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. शिवशक्ती संघाकडून अदिती शिंदे हिने चढाईत, तर पौर्णिमा जेधे हिने पकडीमध्ये चांगली कामगिरी केली. मात्र, विवेक महिला संघाने आघाडी कायम राखत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. व्यावसायिक, कुमार आणि महिला गटांत अनुक्रमे मुंबई पोस्टल, गुड मॉर्निंग स्पोर्ट्स क्लब आणि विवेक महिला संघाने विजेतेपद पटकावले.

राज्य मानांकन कॅरम स्पर्धा संपन्न

। मुंबई प्रतिनिधी ।

एमआयजी क्रिकेट क्लब, वांद्रे येथे आयोजित चौथ्या राज्य मानांकन कॅरम स्पर्धेत महिला एकेरी गटात ठाण्याच्या समृद्धी घाडिगावकरने, तर पुरुष एकेरी गटात मुंबईच्या प्रशांत मोरेने विजेतेपद पटकावले.

महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात समृद्धीने मुंबईच्या ऐशा महम्मद साजिदचा पराभव केला. पहिला सेट ४-२५ असा गमावल्यानंतर समृद्धीने जोरदार पुनरागमन करत दुसरा सेट २३-१८ आणि तिसरा सेट २५-८ असा जिंकला. या विजयासह तिने स्पर्धेचे विजेतेपद आपल्या नावावर केले.

पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात मुंबईच्या प्रशांत मोरेने पुण्याच्या अभिजित त्रिपनकरला २२-१९, २५-२२ असे सरळ दोन सेटमध्ये नमवून विजेतेपद मिळवले. प्रशांतने उपांत्य फेरीत मुंबईच्या सिद्धांत वाडवलकरचा २५-१३, ११-२५, २५-२ असा पराभव केला होता.


प्रशिक्षक जॉर्ज जीझससह झाला वाद | राष्ट्रीय शिबीर सोडल्याचे ठरले कारण

३० दिवसांसाठी क्रिस्टियानो रोनाल्डो निलंबित

। पोर्तुगाल । वृत्तसंस्था ।

जगातील महान फुटबॉलपटूंपैकी एक असलेल्या क्रिस्टियानो रोनाल्डोबद्दल एक मोठी बातमी समोर येत आहे. पोर्तुगीज फुटबॉल फेडरेशनच्या शिस्तपालन समितीने या ४१ वर्षीय फॉरवर्डवर ३० दिवसांची बंदी घातली आहे. त्याला २५५ युरो (अंदाजे २७,१६६ भारतीय रुपये) दंडही ठोठावण्यात आला आहे. या कारवाईमुळे रोनाल्डोची आंतरराष्ट्रीय कारकीर्द संपुष्टात येणार आहे का, असा प्रश्न चाहत्यांमध्ये निर्माण झाला आहे.

संघातील त्याच्या भूमिकेवरून पोर्तुगालचे मुख्य प्रशिक्षक जॉर्ज जीझस आणि रोनाल्डो यांच्यात झालेल्या मतभेदानंतर हा संपूर्ण वाद सुरू झाला. नॉर्वेविरुद्धच्या नेशन्स लीग सामन्यात रोनाल्डोला संपूर्ण वेळ बेंचवर बसवण्यात आले होते. वृत्तानुसार, प्रशिक्षक जॉर्ज जीझस यांनी दोनदा आपला शब्द फिरवला, असा आरोप रोनाल्डोने केला होता. यानंतर, डेन्मार्कविरुद्धच्या सामन्याच्या अगदी आधी रोनाल्डोने कोणालाही न कळवता कोपनहेगनमधील



पोर्तुगीज राष्ट्रीय संघाचे शिबीर सोडले. ९ ऑक्टोबर रोजी सुरू झालेल्या तपासानंतर, एफपीएफने (पोर्तुगीज फुटबॉल फेडरेशन) रोनाल्डोला शिस्तपालन संहितेच्या कलम १६०(१) अंतर्गत हेतुपुरस्सर उल्लंघन केल्याबद्दल दोषी ठरवले आणि सोमवारी त्याच्यावर बंदीची घोषणा केली.

कॅम्पमधून निघून जाण्याच्या संपूर्ण घटनेनंतर, ख्रिस्तियानो रोनाल्डोने आपल्या वर्तनाबद्दल जाहीरपणे माफी मागितली आहे. नॉर्वे सामन्यांनंतर चाहत्यांनी दिलेल्या शुभेच्छांना प्रतिसाद न देणे आणि आपल्या सहकाऱ्यांना मध्येच सोडून जाणे ही चूक होती, असे रोनाल्डोने कबूल केले. त्याने स्पष्ट केले की तो पोर्तुगालसाठी खेळण्यास पूर्णपणे तयार आहे आणि आपली शिक्षा भोगल्यानंतर त्याला संघात परतायचे आहे. त्यामुळे, रोनाल्डो आपली कारकीर्द पुन्हा सुरू करणार आहे, ही चाहत्यांसाठी एक चांगली बातमी आहे.

या निलंबनामुळे रोनाल्डो आगामी कोणते सामने खेळू शकणार नाही हे स्पष्ट होत नसले तरी, पोर्तुगीज फुटबॉल फेडरेशनचे अध्यक्ष पेड्रो प्रोएंसा यांनी संकेत दिले आहेत की, एकदा या प्रकरणाचा निपटारा झाल्यावर रोनाल्डोच्या राष्ट्रीय संघात परतण्याचे दरवाजे खुले आहेत. २-१ च्या विजयानंतर प्रशिक्षक जॉर्ज जीझस यांनीही रोनाल्डोच्या पुनरागमनाचे संकेत दिले आहेत. रोनाल्डोची कारकीर्द संपली आहे असे म्हणणे घाईचे ठरेल, कारण त्याची निलंबनाची शिक्षा पूर्ण झाल्यावर तो मैदानात परत येऊ शकतो.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)